सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२२-२०२३

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

### ( पुस्तक क्रमांक १ )

### ( उच्च शिक्षण )

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६

२०२२

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२२ - २०२३

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

( पुस्तक क्रमांक १ )

( उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. )

# उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तयार केलेल्या कार्यक्रम अंदाजपत्रकांची यादी

| कार्यक्रम अंदाजपत्रकाचा क्रमांक | | | कार्यक्रम अंदाजपत्रकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | .. | .. | उच्च व तंत्रशिक्षण विभाग खुद्द मंत्रालयीन विभागासह (उच्च शिक्षण) |
| २ | .. | .. | उच्च व तंत्रशिक्षण विभाग (तंत्रशिक्षण) |
| ३ | .. | .. | उच्च व तंत्रशिक्षण विभाग (कला व ग्रंथालये) |

# अनुक्रमणिका

## उच्च शिक्षण विभागाची रचना व कार्यपद्धती


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना .. .. .. .. .. | १ |
| २. | वित्तीय आवश्यकता .. .. .. .. .. | १२ |
| ३. | संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या योजनांतर्गत योजना व योजनेतर योजना .. | १४ |
| ४. | शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये .. .. .. .. | १६ |
| ५. | अशासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये .. .. .. .. | १६ |
| ६. | माध्यमिक शाळेतील गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना साहाय्य .. .. .. | १७ |
| ७. | सर्वसाधारण शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदाने .. .. .. | १८ |
| ८. | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, अभिमत विद्यापीठास साहाय्य .. .. | १९ |
| ९. | शासकीय कला महाविद्यालये .. .. .. .. | २० |
| १०. | शासकीय विज्ञान महाविद्यालये .. .. .. .. | २० |
| ११. | शासकीय न्याय साहाय्यक विज्ञान संस्था.. .. .. .. | २१ |
| १२. | शासकीय विधी महाविद्यालये .. .. .. .. | २२ |
| १३. | शासकीय वाणिज्य महाविद्यालये .. .. .. .. | २२ |
| १४. | विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचे परिरक्षण .. .. .. .. | २३ |
| १५. | तालुक्याच्या ठिकाणी प्रियदर्शिनी मुलींची वसतिगृहे सुरू करणे .. .. | २४ |
| १६. | अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, विधी व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान .. | २६ |
| १७. | डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे, अभिमत विद्यापीठांच्या विस्तारासाठी अनुदाने | २८ |
| १८. | अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालये .. .. .. | २९ |
| १९. | महाविद्यालयातील सर्वसाधारण शिष्यवृत्त्या-- .. .. .. | |
| | (अ) महाविद्यालयातील सर्वसाधारण शिष्यवृत्त्या .. .. .. | ३० |
| | (ब) सर्वसाधारण शिष्यवृत्त्या व अधिछात्रवृत्त्या .. .. .. | ३१ |
| | (क) सर्वसाधारण शिष्यवृत्त्या, गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना साहाय्य .. .. | ३२ |
| २०. | उच्च शिक्षण संचालनालय .. .. .. .. | ३३ |
| २१. | राज्य प्रशासनिक सेवा संस्था .. .. .. .. | ३४ |
| २२. | संशोधन संस्थांना अनुदान .. .. .. .. | ३६ |
| २३. | हिंदी भाषेतील मॅट्रिकनंतरच्या अभ्यासासाठी अहिंदी भाषिक राज्यांतील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकारच्या शिष्यवृत्त्या. .. | ३७ |
| २४. | एकलव्य शिष्यवृत्ती योजना .. .. .. .. | ३७ |
| २५. | स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती .. .. .. | ३८ |
| २६. | अवर्षणग्रस्त खेड्यांतील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी प्रतिपूर्ती करणे .. .. | ३८ |
| २७. | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना .. .. | ३९ |

| | | |
|---|---|---|
| २८. | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना .. .. .. | ४० |
| २९. | माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती .. .. .. | ४१ |
| ३०. | अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती .. .. .. | ४२ |
| ३१. | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती .. .. .. .. | ४३ |
| ३२. | जन्मशताब्दी समारंभ व साहित्याला उत्तेजन .. .. .. | ४४ |
| ३३. | लोकसाहित्य निर्मिती .. .. .. .. .. | ४५ |
| ३४. | थोर समाजसेविका कै. सावित्रीबाई फुले पुरस्कार योजना .. .. .. | ४५ |
| ३५. | शिक्षक पुरस्कार व संस्कृत पंडित पुरस्कार .. .. .. .. | ४६ |
| ३६. | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती व महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती. .. | ४८ |
| ३७. | महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था.. .. .. .. | ४९ |
| ३८. | राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) .. .. .. .. | ५० |
| ३९. | मंत्रालय - उच्च व तंत्र शिक्षण विभाग .. .. .. .. | ५० |
| ४०. | मंत्रालय - उच्च व तंत्र शिक्षण विभाग - प्रशासकीय विभाग .. .. | ५१ |
| ४१. | राष्ट्रीय सेवा योजना .. .. .. .. .. | ५२ |
| ४२. | कर्मचारीवर्गाचा गोषवारा .. .. .. .. | ५७ |


संचालक (उच्च शिक्षण)
सहसंचालक
मुख्य प्रशासन अधिकारी
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
प्रशासन अधिकारी (प्रशासन शाखा)
प्रशासन अधिकारी (महाविद्यालयीन शाखा)
प्रशासन अधिकारी (विद्यापीठ शाखा)
प्रशासन अधिकारी (शिष्यवृत्ती शाखा)
विधी अधिकारी
प्रशासन अधिकारी (अंदाजपत्रक शाखा)
सहाय्यक संचालक (लेखा)
अधीक्षक गट ब (प्रशा-१)
अधीक्षक गट क (१)
मुख्य लिपिक (१)
वरिष्ठ लिपिक (१)
कनिष्ठ लिपिक (३)
अधीक्षक गट ब (प्रशा-२)
मुख्य लिपिक (१)
वरिष्ठ लिपिक (२)
कनिष्ठ लिपिक (३)
अधीक्षक गट ब (प्रशा-३)
अधीक्षक गट क (१)
मुख्य लिपिक (१)
कनिष्ठ लिपिक (३)
अधीक्षक गट ब (मवि-१)
मुख्य लिपिक (१)
वरिष्ठ लिपिक (३)
कनिष्ठ लिपिक (२)
अधीक्षक गट ब (मवि-२)
मुख्य लिपिक (१)
वरिष्ठ लिपिक (३)
कनिष्ठ लिपिक (६)
अधीक्षक गट ब (मवि-३)
अधीक्षक गट क (१)
मुख्य लिपिक (१)
वरिष्ठ लिपिक (२)
कनिष्ठ लिपिक (१)
सांख्यिकी अधिकारी
संशोधन सहाय्यक (१)
मुख्य लिपिक (१)
कनिष्ठ लिपिक (१)
अधीक्षक गट ब (विशि-१)
अधीक्षक गट क (१)
मुख्य लिपिक (२)
वरिष्ठ लिपिक (३)
कनिष्ठ लिपिक (५)
अधीक्षक गट ब (शिष्यवृत्ती)
अधीक्षक गट क (१)
मुख्य लिपिक (१)
वरिष्ठ लिपिक (३)
कनिष्ठ लिपिक (५)
कनिष्ठ लिपिक (१)
अधीक्षक गट ब (अंदाजपत्रक)
अधीक्षक गट क (१)
मुख्य लिपिक (१)
वरिष्ठ लिपिक (३)
कनिष्ठ लिपिक (५)
अधीक्षक गट क (१)
मुख्य लिपिक (२)
वरिष्ठ लिपिक (३)
कनिष्ठ लिपिक (६)
स्वीय सहाय्यक
उच्च श्रेणी लघु लेखक
निम्न श्रेणी लघु लेखक
लघु टंकलेखक

# शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालये

## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

### विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) (१०)

१. मुंबई,
२. पुणे,
३. कोल्हापूर,
४. जळगाव,
५. औरंगाबाद,
६. नांदेड,
७. नागपूर,
८. अमरावती,
९. सोलापूर,
१०. पनवेल.

### वरिष्ठ लेखा परीक्षक (उच्च शिक्षण) (१०)

१. मुंबई, २. पुणे, ३. कोल्हापूर, ४. जळगाव, ५. औरंगाबाद, ६. नांदेड, ७. नागपूर, ८. अमरावती, ९. सोलापूर, १०. पनवेल.

### सहसंचालक (१)

शिक्षण शुल्क समिती, मुंबई

### अधीक्षक / अधीक्षिका (३)

१. शासकीय महाविद्यालय वसतिगृह, मुंबई
२. सावित्रीबाई फुले महिला वसतिगृह, मुंबई
३. तेलंग मेमोरिअल होस्टेल, मुंबई

### संचालक (६)

**भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र**

१. मुंबई,
२. औरंगाबाद,
३. नागपूर,
४. कोल्हापूर,
५. नाशिक,
६. अमरावती

### संचालक (१)

सिडनहॅम व्यवस्थापकीय व उद्योजकीय शिक्षण व संशोधन संस्था, मुंबई

### अधीक्षक / अधीक्षिका (९)

**नवीन मुलींचे वसतिगृह**

१. डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे
२. शासकीय तंत्र निकेतन, जळगाव
३. अध्यापक महाविद्यालय, औरंगाबाद
४. जालना, जि. औरंगाबाद
५. नांदेड विद्यापीठ परिसर, नांदेड
६. विज्ञान महाविद्यालय परिसर, गडचिरोली
७. महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिसर, सोलापूर.
८. अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल
९. इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी, मुंबई

### प्राचार्य / संचालक (४)

**विज्ञान संस्था**

१. मुंबई,
२. नागपूर,
३. औरंगाबाद,
४. गडचिरोली

### संचालक (३)

१. न्याय सहायक विज्ञान संस्था, मुंबई,
२. न्याय सहायक विज्ञान संस्था, औरंगाबाद,
३. न्याय सहायक विज्ञान संस्था, नागपूर

### संचालक (१)

वसंतराव नाईक शासकीय क. व समाज विज्ञान संस्था, नागपूर

### अधीक्षक / अधीक्षिका (११)

**आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय वसतिगृह**

१. मालेगाव, जि. नाशिक २. बुधगाव, जि. सांगली
३. कोल्हापूर ४. शहादा, जि. नंदुरबार ५. बीड
६. नांदेड ७. वर्धा ८. वरोरा, जि. चंद्रपूर ९. अमरावती
१०. यवतमाळ ११. जव्हार, जि. पालघर

### प्राचार्य (१९)

शासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व अध्यापक महाविद्यालये

# विद्यापीठ व उच्च शिक्षण

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्यामधून एकूण उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी २५ टक्के विद्यार्थी वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकडे प्रवेश घेतात. उर्वरित ७५ टक्के विद्यार्थी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांमधून प्रवेश घेतात. मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांमधून उच्च शिक्षण घेत असल्यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या सोयी व दर्जामध्ये वाढ करण्याच्या हेतूने शासनाने सन १९८४ सालापासून शालेय शिक्षण विभागापासून उच्च शिक्षण हा विभाग वेगळा केलेला आहे.

उच्च शिक्षण विभागाचे स्वतंत्र कार्यालय स्थापन केले आहे. सदर कार्यालय शासकीय मध्यवर्ती इमारत (जुनी), पुणे स्टेशनजवळ, पुणे-१ येथे कार्यरत आहे. उच्च शिक्षण या संस्थेमध्ये अकृषिक विद्यापीठे व विद्यापीठांशी संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालयांचा समावेश होतो. यामधून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकविले जातात.

मंत्रालयातील उच्च व तंत्र शिक्षण या प्रशासकीय विभागाकडून उच्च शिक्षण संचालनालयावर देखरेख व नियंत्रण ठेवले जाते. संचालनालय हे महाराष्ट्रातील सर्व उच्च शिक्षण संस्थांसाठीचे मुख्य कार्यालय म्हणून कार्य करते. संचालनालयाच्या वतीने विभागीय स्तरावर दहा सहसंचालक कार्यालये कार्यरत आहेत. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली खालील शासकीय महाविद्यालये/संस्था/वसतिगृहे कार्यरत आहेत.

| महाविद्यालये/संस्था/वसतिगृहे | संख्या |
|---|---|
| शासकीय अध्यापक महाविद्यालये | १२ |
| शासकीय कला महाविद्यालये | ०६ |
| शासकीय वाणिज्य महाविद्यालये | ०२ |
| शासकीय न्याय साहाय्यक संस्था | ०३ |
| शासकीय विज्ञान संस्था | ०४ |
| शासकीय विधी महाविद्यालय | ०१ |
| प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण संस्था | ०६ |
| शासकीय वसतिगृहे (प्रियदर्शनी वसतिगृहे) | २४ |
| आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांची वसतिगृहे | ११ |
| सहसंचालक कार्यालय येथे नवीन मुलांची वसतिगृहे (प्रस्तावित) | ९ |

**विद्यापीठ.—** उच्च शिक्षण या संज्ञेमध्ये पदवी व पदव्युत्तर आणि डॉक्टरेट व त्यानंतरचे संशोधन कार्य असे अभ्यासाचे विभाग येतात. निरनिराळ्या विद्या शाखांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम हे विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या शासकीय व अशासकीय महाविद्यालयांतून व दहा अकृषिक विद्यापीठांच्या मार्गदर्शनानुसार दिले जाते. सर्व अपारंपरिक अकृषिक विद्यापीठांकरिता सन १९९४ मध्ये महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ अमलात आणला आहे. या कायद्यान्वये सर्व विद्यापीठांना सारखीच कार्ये व अधिकार प्रदान करण्यात आले. उच्च शिक्षणाच्या निरनिराळ्या पातळ्यांवर सुयोग्य शिक्षणक्रम तयार करणे व त्यानुसार ते कार्यक्षमतेने अमलात आणणे, तसेच शैक्षणिक दर्जा उंचावून तो अधिकाधिक संपन्न करण्यासाठी अभ्यासक्रमात योग्य त्या सुधारणा करणे हे विद्यापीठाचे मुख्य कार्य आहे.

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली स्थापना.—** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे विभाजन करून गडचिरोली व चंद्रपूर या दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेला आहे. सदरचे विद्यापीठ सध्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे उपकेंद्र गडचिरोली येथे असलेल्या इमारतीत सुरू झालेले आहे. तसेच त्या ठिकाणी कुलगुरू व इतर संवैधानिक पदांची निर्मिती करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे.

तसेच शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक जीयूजी २०१०/(६२२/१०)/विशि-१ दिनांक १० डिसेंबर २०१० अन्वये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठातील शिक्षकेतर ९४४ पदांपैकी १६० पदे गोंडवाना विद्यापीठाकडे वर्ग करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

तसेच शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण २०१२/(२८९/१२)/विशि-१, दिनांक-११ नोव्हेंबर २०१४ नुसार या विद्यापीठांच्या इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र, वाणिज्य व गणित या पाच विभागांसाठी ३५ अध्यापकीय व ४ शिक्षकेतर पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

| | राज्यातील विद्यापीठे | कार्यक्षेत्रातील जिल्हे |
|---|---|---|
| १. | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | पुणे, नाशिक, अहमदनगर, |
| २. | मुंबई विद्यापीठ, मुंबई | मुंबई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी, |
| ३. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | कोल्हापूर, सांगली, सातारा, |
| ४. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर | सोलापूर |
| ५. | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | जळगाव, धुळे, नंदुरबार, |
| ६. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, |
| ७. | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली. |
| ८. | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | अमरावती, वाशिम, अकोला, यवतमाळ |
| ९. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया |
| १०. | एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई | महाराष्ट्र राज्य |
| ११. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | महाराष्ट्र राज्य |
| १२. | कवी कुलगरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपूर. | महाराष्ट्र राज्य |
| १३. | डेक्कन कॉलेज, पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे, (अभिमत विद्यापीठ). | महाराष्ट्र राज्य |
| १४. | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, (अभिमत विद्यापीठ) | महाराष्ट्र राज्य |
| १५. | गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, भांडारकर रोड, पुणे. | महाराष्ट्र राज्य |
| १६. | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | गडचिरोली, चंद्रपूर |

**महाविद्यालये.—** प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या सोई विस्तृत प्रमाणावर उपलब्ध करून शिक्षणाला उत्तेजन देण्याचे धोरण आहे. शालेय पातळीवर विस्ताराचे धोरण असल्याने महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होणे अपरिहार्य आहे. महाराष्ट्र राज्यात शासनातर्फे केवळ २८ महाविद्यालये चालविण्यात येतात. तर खाजगी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित महाविद्यालयांची एकूण संख्या ११७७ इतकी आहे. खाजगी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयांना अनुदान देण्यात येते. सन १९८३-८४ पासून नवीन महाविद्यालयांना विनाअनुदान तत्त्वावर परवानगी दिली आहे.

विनाअनुदान तत्त्वावर जी महाविद्यालये सन १९८३-८४ पासून सुरू झालेली आहेत, त्यांना अनुदान देण्याचा निर्णय शासनाने शासन निर्णय, क्रमांक एनजीसी/२०८८/१६५२/विशि/२-ए, दिनांक ८ ऑगस्ट १९८९ अन्वये घेतला आहे. त्यानुसार जी नवीन महाविद्यालये शासनाने विहित केलेल्या अटी पूर्ण करतील, त्यांना खालीलप्रमाणे अनुदान दिले जाईल:-

१. विद्याशाखा, नवीन विषय, नवीन अभ्यासक्रम व जादा तुकड्या मंजूर केल्यानंतर पहिल्या तीन वर्षामध्ये कोणतेही अनुदान मंजूर करण्यात येणार नाही.

२. ४ थ्या वर्षी मान्य खर्चाच्या २५ टक्के

३. ५ व्या वर्षी मान्य खर्चाच्या ५० टक्के

४. ६ व्या वर्षी मान्य खर्चाच्या ७५ टक्के

५. ७ व्या वर्षी मान्य खर्चाच्या १०० टक्के

अनुदानित व विनाअनुदानित माहिती महाविद्यालय व आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नवीन विद्याशाखा, नवीन विषय, नवीन अभ्यासक्रम व ज्यादा तुकड्या मंजूर केल्यास, त्यांनाही वरील अनुदान सूत्राप्रमाणेच अनुदान मंजूर केले जाईल. त्यांना तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर मान्य खर्चाच्या १०० टक्के अनुदान देय होईल.

शासनाने २००१-०२ पासून कायम विनाअनुदान तत्त्वावर महाविद्यालयांना मान्यता देण्याचे धोरण स्वीकारले आहे.

प्रत्येक विद्यापीठाच्या कार्यकक्षेत असलेली महाविद्यालये ही त्या-त्या विद्यापीठांना संलग्न केलेली आहेत. महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा संबंधित विद्यापीठांनी केलेल्या अधिनियम व प्रमाणसंहितानुसार नियमित केल्या जातात. खाजगी महाविद्यालयांसाठी शासनाने बँकांद्वारे वेतन देण्याची योजना सुरू केलेली आहे.

**अभ्यासक्रम (Courses)**

**विद्यापीठे.—** विद्यापीठामध्ये कला, विज्ञान, वाणिज्य, विधी या विद्याशाखांचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम घेतले जातात. तसेच एमफिल, पीएचडी, एमबीए, होम सायन्स, संगणकाचे बीसीए, बीबीए, आयटी, विधी शाखेतील एलएलबी, एलएलएम, डीटीएलचे अभ्यासक्रम विद्यापीठांमधून राबविले जातात.

**महाविद्यालय.—** कला, विज्ञान, वाणिज्य, विधी या विद्याशाखांचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम घेतले जातात. तसेच संगणकाचे बीसीए, विधी शाखेचे एलएलबी, एलएलएम, डीटीएलचे अभ्यासक्रम महाविद्यालयामधून घेतले जातात. राज्यामधील महाविद्यालये यामध्ये शिक्षकांची ३३८३२ इतकी संख्या आहे, तर शिक्षकेतर कर्मचारी ३१७३७ इतके आहेत. तसेच विद्यापीठांमध्ये शिक्षकांची संख्या २४७२ इतकी आहे, तर शिक्षकेतर कर्मचारी ७१३३ इतकी आहे.

**शारीरिक शिक्षण महाविद्यालय**

शासन निर्णय, क्रमांक शाशिम/४५१३-प्रक्र.४६४/१३ आस्था-१/दिनांक १३ फेब्रुवारी २०१४ अन्वये क्रीडा व युवक सेवा, कल्याण संचालनालय, पुणे यांच्या अधिनस्त असलेला उच्च शिक्षण संचालनालय, पुणेकडे वर्ग करण्यात आलेला असल्याने शारीरिक शिक्षण विषयांतर्गत येणारी अनुदानित ९ महाविद्यालये व १०० विनाअनुदानित महाविद्यालयांच्या आस्थापनाविषयक व तद्नुषंगिक सर्व कामकाज उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडून हाताळले जात आहे.

**योजना**

**१. शिष्यवृत्ती व सवलती.—** उच्च शिक्षण घेण्याची गुणवत्ता, पात्रता व महत्त्वाकांक्षा असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला केवळ आर्थिक अडचणीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षण चालू राहावे म्हणून गुणवत्ता शिष्यवृत्त्या मंजूर केल्या जातात. तसेच ग्रामीण भागातून आलेल्या व निवासी शाखांमधून माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही पुढील शिक्षण चालू ठेवण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या शिष्यवृत्त्या मंजूर केल्या जातात. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत आहे.

१. राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती
२. गणित व भौतिकशास्त्र विषयातील शिष्यवृत्ती.
३. शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती.
४. राज्य शासनाची दक्षिणा व अधिछात्रवृत्ती
५. गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना साहाय्य.
६. हिंदी भाषेतील मॅट्रिकनंतरच्या अभ्यासासाठी अहिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती
७. एकलव्य शिष्यवृत्ती योजना.
८. स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती.
९. अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी प्रतिपूर्ती.
१०. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती.
११. माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती.
१२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.
१३. अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना.

१४. वीर मरण पत्करलेल्या व शहीद झालेल्या पोलीस व इतर राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणांतर्गत महाविद्यालयीन शिक्षणाच्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत शासन निर्णय, क्रमांक टीईएम-२००८/(५४२/०८)/तांशि-१, दिनांक २७ फेब्रुवारी २००९ नुसार शासन निर्णय क्र. अर्थस-२०१५/(२४९/१५)/मशि-३, दिनांक ४ जानेवारी २०१६ योजनेचा उद्देश--मुंबई येथे दिनांक २६ ते २९ नोव्हेंबर २००८ या कालावधीत झालेल्या आतंकवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलातील जवान तसेच इतर शासकीय कर्मचाऱ्यांच्या अपत्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या पदव्युत्तर पदवी स्तरापर्यंत मोफत शिक्षण देण्याचा शासन निर्णय घेण्यात आला आहे.

(उपरोक्त क्रमांक ६, ८ व १४ वरील शिष्यवृत्ती केंद्र शासन पुरस्कृत आहेत तर उर्वरित राज्य शासन पुरस्कृत आहेत.)

**२. पुरस्कार--**

१. सावित्रीबाई फुले पुरस्कार

२. शिक्षक पुरस्कार

३. संस्कृत पुरस्कार

**(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व युवकसेवा विभाग क्रमांक संकीर्ण १०७१/८९९७९/अठ्ठावीस-३७२, दिनांक १५ मार्च १९७६ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व युवकसेवा विभाग क्रमांक मजोफु-१०९०/(५८४१)/संस्कृती-१, दिनांक २८ डिसेंबर १९९० अन्वये महात्मा जोतिराव फुले चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

३. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक डीबीए-१००२/(११५/०५)/समन्वय, दिनांक २२ ऑगस्ट २००५ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती व महात्मा जोतिराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती या दोन्ही समित्यांच्या एकत्रीकरणासह राजर्षी शाहू महाराज यांच्याविषयक साहित्याचे प्रकाशन करण्याची अतिरिक्त कार्यकक्षा निश्चित करून एक सामाईक समिती म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती स्थापन करण्यात आली होती, त्यानंतर शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक डीबीए-२००८/(८६/०८)/समन्वय, दिनांक ३० सप्टेंबर २००८ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले व राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती अशा तीन स्वतंत्र समित्या गठित करण्यात आल्या आहेत.

त्यानंतर शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक समिती-२५१४/(प्र.क्र.८६/१४)/समन्वय, दिनांक ६ सप्टेंबर २०१४ अन्वये राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे या मालिकेतील एकूण २१ खंड, २२ वा फोटो बायोग्राफीचा खंड व २ सोर्स मटेरियल प्रकाशित करण्यात आलेले आहेत. संपलेल्या काही खंडांचे पुनर्मुद्रण करण्यात येत आहे. यासाठी विशेष घटक योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या ग्रंथांना महाराष्ट्रात व देशात मोठी मागणी आहे.

महात्मा जोतिराव फुले यांची एकूण १३ पुस्तके प्रकाशित करण्यात आली असून याव्यतिरिक्त ९ पुस्तके छपाईसाठी मुद्रणालयास दिली आहेत. सदर पुस्तक प्रकाशनासाठी विशेष घटक योजनेंतर्गत निधी उपलब्ध आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा राजर्षी शाहू गौरव ग्रंथ हा १ ग्रंथ ३ आवृत्त्यांमध्ये प्रकाशित करण्यात येत आहे. सदर ग्रंथ प्रकाशनासाठी विशेष घटक योजनेंतर्गत निधी उपलब्ध आहे.

**३. लोकसाहित्य समिती.—** शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक बीएसी-१५४४/२०५३५/क्यू, दिनांक ७ जानेवारी १९७५ अन्वये समिती गठित करण्यात आली होती. त्यानंतर प्रा. फ. मु. शिंदे, राहणार औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक समिती २५१४/(प्र.क्र.८६/१४)/समन्वय, दिनांक ६ सप्टेंबर २०१४ अन्वये सदर समिती पुनर्गठित करण्यात आली आहे. मराठी प्रदेशातील लोकसाहित्यांचे संशोधन करणे, शासनास सल्ला देणे असे या समितीच्या कामाचे स्वरूप आहे. समितीने या अगोदर प्रकाशित केलेल्या एकूण २७ खंडांचे पुनर्मुद्रणाचे काम सुरू आहे.

**४. वसतिगृहे.—** मुंबईमधील विविध महाविद्यालयांमधून शिक्षण घेणाऱ्या मुलींची राहण्याची सोय होण्यासाठी मुंबईमध्ये सावित्रीदेवी महिला मंत्रालय, ३५, नेताजी सुभाष रोड, चर्नी रोड आणि न्या. तेलंग स्मारक वसतिगृह, चर्चगेट या दोन ठिकाणी मुलींच्या निवासाची सोय करण्यात येते. तसेच मुंबईमधील शासकीय महाविद्यालय व संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय महाविद्यालय वसतिगृह, चर्चगेट, मुंबई येथे निवासाची सोय उपलब्ध आहे. शासकीय इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी, मुंबई येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची निवासाची सोय महाविद्यालय परिसरामध्ये बांधण्यात आलेल्या वसतिगृहामध्ये करण्यात येते. शासकीय महाविद्यालय वसतिगृह, चर्चगेट, मुंबई येथे ज्या विद्यार्थ्यांची निवासाची सोय होत नाही, त्या विद्यार्थ्यांची शासकीय इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी, मुंबई येथील वसतिगृहामध्ये निवासाची सोय करण्यात येते.

आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निवासाच्या सोयी, सुविधा उपलब्ध होण्यासाठी राज्यामध्ये ११ वसतिगृहांची स्थापना केलेली आहे. या वसतिगृहांमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना निवास व भोजनाची व्यवस्था मोफत दिली जाते.

**५. प्रियदर्शिनी वसतिगृहे.—** भारताच्या माजी पंतप्रधान स्व. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्मरणार्थ राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ५० ते १०० मुलींची सोय असलेली प्रियदर्शिनी वसतिगृहे सुरू करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्रमांक टीडब्ल्यूएच-१०९४/७१/मशि-४, दिनांक ३१ जुलै १९९५ मधील तरतुदीनुसार राज्यांमध्ये २१ संस्थांना प्रियदर्शिनी वसतिगृहे सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे.

**६. विद्यापीठ, महाविद्यालयांमधील शिक्षकांना परदेशात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदा, शिबिरे, संमेलने यांना उपस्थित राहण्यासाठी अर्थसाहाय्य योजना.—** सदर योजना शासनाने सन १९८०-८१ या आर्थिक वर्षापासून सुरू केलेली आहे. विद्यापीठ किंवा संलग्न असलेल्या शासकीय/अशासकीय महाविद्यालयांतील एक शिक्षक याप्रमाणे परदेशी जाणाऱ्या शिक्षकांना प्रवास खर्चाच्या टक्के अर्थसाहाय्य अधिक आमंत्रित देशात राहण्याचा व जेवणाचा खर्च असे जास्तीत जास्त रुपये १०,००० अनुदान देण्यात येते.

**७. अकृषिक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती योजना.—** शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एनजीसी-१२८३/८६५/विशी-४, दिनांक २१ जुलै १९८३ अन्वये अकृषिक विद्यापीठे व महाविद्यालयांतून दिनांक १ ऑक्टोबर १९८२ पासून व त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेली आहे. या योजनेची व्याप्ती आता दिनांक १ जानेवारी १९७३ पूर्वी तसेच दिनांक १ ऑक्टोबर १९८२ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

**८. प्रवेश नियंत्रण समिती व शिक्षण शुल्क समिती.—** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील तरतुदीनुसार शासकीय, शासन अनुदानित, बिगर अनुदानित व्यावसायिक संस्थांतील प्रवेशासाठी शिक्षण शुल्क समिती आणि प्रवेश नियंत्रण समिती अशा दोन समित्यांची स्थापना दिनांक २४ ऑक्टोबर २००३ च्या शासन निर्णयानुसार केलेली आहे. या समित्यांवर मा. उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे.

**९. शिक्षण शास्त्र अध्यापक महाविद्यालय, शारीरिक शिक्षण महाविद्यालय.—** सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय/अशासकीय शिक्षण शास्त्र शारीरिक शिक्षण महाविद्यालय व विधी पदवी महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेशासाठी संचालनालय स्तरावर सामाईक परीक्षा (सीईटी) घेण्यात येत होती. तथापि सन २०१६-१७ पासून आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूतप्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश देण्यात येतात.

**१०. महिला अर्थसंकल्प (Gender Budget)**

**महिलांविषयी अर्थसंकल्प (Gender Budget)**

**१. योजनेचे नाव-** महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजना.

**योजनेचा उद्देश--**

**१.** तालुक्याच्या ठिकाणी मुलींची वसतिगृहे सुरू करणे.

**प्रस्तावना.—** भारताच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या स्मरणार्थ इ.स. २००० सालापर्यंत राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ५० ते १०० मुलींची सोय असलेली प्रियदर्शनी वसतिगृहे सुरू करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला आहे.

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक टीडब्ल्यूएच-१०९४/मशि-४, दिनांक ३१ जुलै १९९५ मधील तरतुदीनुसार राज्यातील २१ स्वयंसेवी संस्थांना प्रियदर्शनी वसतिगृह सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे.

**२. राज्यामध्ये उच्च शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली सहसंचालक (उच्च शिक्षण) यांच्या मुख्यालयी मुलींची नवीन वसतिगृहे सुरू करणे-**

शासन निर्णय, क्रमांक वसति-२०१०/प्र.क्र. २२८/१०/मशि-२ दिनांक २० एप्रिल २०१३ अन्वये राज्यामध्ये उच्च शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली सहसंचालक (उच्च शिक्षण) यांच्या मुख्यालयी मुलींची नवीन ९ वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. राज्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणापेक्षा महाविद्यालयीन शिक्षणात मुलींचे प्रमाण फारच कमी आहे.

सध्या असलेली वसतिगृहाची व्यवस्था तुटपुंजी असून बऱ्याच मुलींना उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये/संस्था यांच्या नजीकच्या परिसरात आश्वासित निवासाची व्यवस्था नसल्याने परगावी/दूरच्या ठिकाणी शिक्षणासाठी पाठविण्यास पालक तयार होत नाहीत. त्यामुळे उच्च शिक्षणापासून मुली वंचित राहतात. पर्यायाने उच्च शिक्षणात मुलींची गळती वाढते. हे विचारात घेऊन मुलींना उच्च शिक्षण घेणेसाठी आश्वासित व संरक्षित पूरक स्थिती निर्माण करणे तसेच उच्च शिक्षणातील मुलींची गळती थांबविण्यासाठीच्या उपाययोजनेचा एक भाग म्हणून मुलींसाठी वसतिगृहाची सोय करणे अगत्याचे झाले आहे.

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखाली १० विभागीय संचालकांची कार्यालये कार्यरत आहेत. विभागीय सहसंचालक हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील उच्च शिक्षणाची निकोप वाढ, संवर्धन, गुणवत्तावाढ, शिक्षणात आधुनिकतेचे समावेशन इत्यादीसाठी संबंधित विद्यापीठांच्या बरोबरीने जबाबदार आहेत. विभागीय सहसंचालकांच्या मुख्यालयी व त्यांच्या नियंत्रणाखाली नव्याने वसतिगृह स्थापित करणे व सध्या शासकीय महाविद्यालयात असलेल्या वसतिगृहांची क्षमता वाढविण्याची बाब शासनाच्या काही काळ विचाराधीन होती.

(१) राज्यामध्ये मुलींचा उच्च शिक्षणात सहभाग वाढविणे, सर्व समाजघटकांचा त्यात समावेश करण्यासाठी मुलींची आश्वासित व सुरक्षित निवासाची सोय उच्च शिक्षणाच्या चांगल्या संस्था जेथे स्थित आहेत तेथे व्हावी म्हणून राज्यात ९ ठिकाणी नवीन वसतिगृहे बांधण्यास व सध्या कार्यरत असलेल्या ५ वसतिगृहांचा विस्तार करण्यास याद्वारे शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच या नवीन वसतिगृहाच्या माध्यमातून एकूण १७७० व वसतिगृहाच्या माध्यमातून ४८० अशा एकूण १४ वसतिगृहांमध्ये २२५० प्रवेश क्षमता निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर वसतिगृहाचे ठिकाण, प्रवेश क्षमता व ढोबळ अंदाजित खर्च यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

**(अ) नवीन वसतिगृहे.—** इस्माईल युसुफ महाविद्यालय, हिंदू फ्रेंड सोसायटी रोड, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई, (२) पुणे-डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, येरवडा, पुणे, (३) शासकीय अध्यापक महाविद्यालय, स्टेशन रोड औरंगाबाद, (४) जळगाव (शासकीय तंत्रनिकेतन) जळगाव, (५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसर, ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड, (६) सोलापूर- (महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्था), सोलापूर, (७) अध्यापक महाविद्यालय, मुंबई-पुणे मार्ग, पनवेल, (८) विज्ञान महाविद्यालय, चामोर्शी रोड, गडचिरोली, (९) जालना, जिल्हा जालना.

**(ब) सध्या शासकीय महाविद्यालयातील असलेली विस्तार करावयाची वसतिगृहे.—** (१) राजाराम महाविद्यालय, विद्यानगर, कोल्हापूर, (२) शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय, विले अर्क, औरंगाबाद, (३) विज्ञान संस्था, (अ) वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नेहरू मार्ग, रिझर्व बँक रोड, नागपूर (ब) विज्ञान संस्था, रवींद्रनाथ टागोर मार्ग, सिव्हिल लाईन, नागपूर, (४) शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, विदर्भ महाविद्यालय रोड, अमरावती अशी एकूण १४ वसतिगृहे.

**(३) राज्यातील महाविद्यालयांमध्ये व शैक्षणिक संस्थांमध्ये स्त्री जागर जाणिवांचा अभियानांतर्गत पारितोषिक देणे.—** पुरुष समानतेची बीजे रुजविण्यासाठी शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१२/प्र.क्र. २९६/१२/विशी-१, दिनांक २३ ऑक्टोबर २०१२ अन्वये राज्यातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये स्त्री-पुरुष समानतेची बीजे रुजविण्यासाठी जागर जाणिवांचा अभियानांतर्गत पारितोषिक देणे योजना सुरू करण्यात आली आहे.

**११. शिक्षण शुल्क समिती**

**प्रस्तावना**

मा. सर्वोच्च न्यायालयाने टीएमए पै फौंडेशन विरुद्ध कर्नाटक राज्य या न्यायालयीन प्रकरणी ११ न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार शासन निर्णय, क्रमांक यूएसजी-२००३/(८५/०३)/ विशि-४, दिनांक २४/९/२००३ अन्वये गठित करण्यात आलेल्या शिक्षण शुल्क समितीकडून राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यात येत आहे. दरम्यान राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांची अधिसूचना क्रमांक एफ नं. ५१-३/२००९/ पीटी/एनसीटीई/(एन. ॲन्ड एस.), दिनांक २५ ऑगस्ट २०१० अन्वये National Council for Teacher Education (Guidelines for regulation of tuition fees and other fees chargeable by unaided teacher education institutions) Amendment Regulation, 2010 निर्गमित केली आहे. सदर विनियमातील तरतुदीनुसार विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण

शुल्क समितीची रचना विहित केली आहे. या पार्श्वभूमीवर श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था तसेच प्राचार्य, श्री साईबाबा अध्यापक महाविद्यालय, गडचिरोली यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक २९११/२०१० अन्वये सध्या अस्तित्वात असलेल्या शिक्षण शुल्क समितीकडून विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांतील अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्याच्या अधिकारितेच्या वैधतेबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. शिक्षण शुल्क समितीनेही राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद विनियमानुसार विना अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्याचे अधिकार शिक्षण शुल्क समितीस नसल्याची भूमिका घेतली होती. सदर न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांनी National Council For Teacher Education (Guidelines for regulation of tuition fees and other fees chargeable by unaided teacher education institutions) Amendment Regulation, 2010 मधील तरतुदीनुसार शिक्षण शुल्क समिती गठित करण्याचा निर्णय दिला आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त विनियमानुसार राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी स्वतंत्र शिक्षण शुल्क समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -** National Council For Teacher Education ( Guidelines for regulation of tuition fees and other fees chargeable by unaided teacher education institutions ) Amendment Regulation, 2010 मधील नियम ५ मधील तरतुदीनुसार राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शुल्क-२०१५/प्र.क्र.४३४/१५/मशि-३, दिनांक १९ जानेवारी २०१६ च्या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे शिक्षण शुल्क समिती गठित करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग .. | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव, वित्त विभाग किंवा त्यांचा प्रतिनिधी .. | सदस्य |
| ३. | Institutional finance, Cost Accountancy and Economics मधील .. | सदस्य |
| | दोन तज्ज्ञ व्यक्तींना नामनिर्देशनाने<br>(१) प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य महाविद्यालय, मुंबई,<br>(२) एक सनदी लेखापाल .. | सदस्य |
| ४. | (१) खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचा १ प्रतिनिधी नामनिर्देशनाने (शिक्षणशास्त्र) .. | सदस्य |
| | (२) खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचा एक प्रतिनिधी नामनिर्देशाने (शारीरिक शिक्षणशास्त्र) | |
| ५. | सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई .. | सदस्य |
| ६. | संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे .. | सदस्य सचिव |

**नामनिर्देशित समिती सदस्यांचा कार्यकाल.—** नवीन शिक्षण शुल्क समितीतील नामनिर्देशित सदस्यांचा कार्यकाल ३ वर्षांचा राहील.

**समितीची कार्यकक्षा.—** शिक्षण शुल्क समिती राज्यातील अकृषिक विद्यापीठांशी संलग्नित विना अनुदानित/कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड., एम.एड. या अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चित करील.

**समितीच्या जबाबदाऱ्या**

१. राज्यातील अकृषिक विद्यापीठ क्षेत्रातील प्रत्येक विना अनुदानित/कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क लागू करण्यासंबंधी सूत्र तयार करणे व त्यास योग्य प्रमाणात प्रसिद्धी देणे.

२. शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी कार्यपद्धती विहित करणे.

३. दरवर्षी शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी वेळापत्रक जाहीर करणे.

४. विहित मुदतीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर न केल्यास विलंब कालावधीसाठी दंडात्मक शुल्क आकारणीचे दर विहित करणे.

५. संबंधित महाविद्यालयांचे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यासाठी सदर संस्थेची स्थापना, कार्यक्षेत्र, शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम, विद्यार्थी संख्या व त्यासंदर्भात एन.सी.टी.ई./शासन इत्यादी यांनी विहित केलेले निकष याची माहिती प्राप्त करून घेणे.

६. शैक्षणिक अभ्यासक्रम राबविण्याच्या पद्धती, कार्यभार व त्यावरील नियुक्त्या, परीक्षा पद्धती व त्यावरील खर्चाची माहिती घेणे व पुढील पाच वर्षांतील संस्थेच्या विकासात्मक कार्याची माहिती घेणे, यासाठी योग्य ती कार्यपद्धती विहित करणे.

७. महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रस्तावात दिलेली माहिती ही वस्तुस्थितीनुरूप असल्याबाबतची खातरजमा करून/ प्रस्तावाची तपासणी करून विहित करण्यात आलेल्या सूत्रानुसार संबधित संस्था/महाविद्यालयातील शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शुल्क एक महिन्याच्या आत निश्चित करणे.

८. शुल्क प्रमाणित करताना शिक्षणशास्त्र महाविद्यालयाकडून उपलब्ध झालेल्या माहितीची पडताळणी करून शुल्क निश्चित करणे, मात्र, यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास वा वाद निर्माण झाल्यास त्याबाबत तपासणी पथकामार्फत प्रत्यक्ष तपासणी करून वस्तुस्थितीनुसार तक्रार झाल्यास त्याबाबत अधिकार शासनाकडे असतील.

९. महाविद्यालयांनी प्रस्तावित केलेल्या व समितीने निश्चित केलेल्या शुल्काची अंमलबजावणी संस्थांनी करून त्याचा अहवाल शासनास, विद्यापीठास, संबंधित आयोगास एन.सी.टी.ई. इत्यादी यांना कळविल्याची खात्री करणे व एक प्रत समितीकडे ठेवणे.

१०. समितीने निश्चित केलेले शुल्क हे पुढील ३ वर्षांसाठीच लागू राहील. त्यानंतर पुढील कालावधीसाठी हे शुल्क पुन्हा निश्चित करून घ्यावे लागेल.

## १२. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची ग्रंथसंपदा प्रकाशित करण्यासाठी शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक लोअसो/१२१२/(प्र.क्र.१४०/१२)/समन्वय, दिनांक १६ जून २०१४ अन्वये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती गठित करण्यात आली आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या चरित्रावर प्रकाशित केलेल्या ग्रंथांना महाराष्ट्रात, देशात व परदेशांत मोठी मागणी आहे. सदर समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहे.

१. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे संपूर्ण वाङ्मय ग्रंथ स्वरूपात प्रकाशित करणे.
२. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हिंदी व इंग्रजी आदी भाषांमध्ये प्रकाशित करणे.
३. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे सप्रमाण व अद्ययावत चरित्र लिहून, त्यांचे हिंदी व इंग्रजी आदी भाषांमध्ये भाषांतर करणे व प्रसिद्ध करणे.
४. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे जीवनकार्यावरील तसेच समीक्षापर साहित्य प्रकाशित करणे.
५. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे अप्रकाशित साहित्याचे संकलन व संपादन करणे.
६. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे संशोधन करणे.

## १३. राष्ट्रीय नोंदणी दरापेक्षा कमी विद्यार्थी नोंदणी असलेल्या जिल्ह्यात आदर्श महाविद्यालयाची स्थापना

शासन निर्णय, क्रमांक एनजीसी-२००९/ (प्र.क्र. ५९/०९) /मशि-४, दिनांक १४ मार्च २०१३. केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभाग मंत्रालयाने भारतातील ज्या जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय नोंदणी दरापेक्षा कमी विद्यार्थी नोंदणी असलेल्या प्रत्येक जिल्ह्यात एक आदर्श महाविद्यालय सुरू करण्याची योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेत नियोजन विभागास सादर केली होती. सदर जिल्ह्यामध्ये विद्यार्थी नोंदणी दर वाढविण्यासाठी त्या जिल्ह्यात एक आदर्श महाविद्यालय स्थापन करण्याची मा. पंतप्रधानांनी दिनांक १५ ऑगस्ट, २००७ रोजी घोषणा केलेली आहे. केंद्र शासनाने सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यात देशातील ९० जिल्ह्यांमध्ये प्राथम्याने आदर्श महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे, या ९० जिल्ह्यांमध्ये राज्यातील ७ जिल्ह्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील १ जिल्हा वरील (क) प्रवर्गात मोडतो व ६ जिल्हे (ड) प्रवर्गात मोडतात ते महाराष्ट्रातील सात जिल्हे पुढीलप्रमाणे आहेत :- १) बुलढाणा, २) गडचिरोली, ३) जालना, ४) हिंगोली, ५) रत्नागिरी, ६) रायगड, ७) सिंधुदुर्ग.

### अटी व शर्ती

१. राष्ट्रीय नोंदणी दरापेक्षा विद्यार्थी नोंदणीचा दर कमी असलेल्या जिल्ह्यामध्ये आदर्श महाविद्यालय स्थापन करण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या क्रमांक F.1-8/2008(cpp-II) दिनांक ३१ डिसेंबर २००८ च्या पत्रासोबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

२. सदर आदर्श महाविद्यालय हे संबंधित विद्यापीठांचे घटक (Constitution) महाविद्यालय राहील.

३. सदर आदर्श महाविद्यालयातील अभ्यासक्रम ते महाविद्यालय स्वायत्त होईल असे परिपूर्ण असावेत.

४. सदर आदर्श महाविद्यालयामध्ये सुरू करावयाचे अभ्यासक्रम निवडताना समाजातील ज्या स्तराचा विचार करून आदर्श महाविद्यालय सुरू केले जाणार आहे त्या घटकांना याचा लाभ होईल याची खातरजमा संबंधित विद्यापीठांनी करावी.

५. संबंधित विद्यापीठांच्या कुलगुरूंनी सदर महाविद्यालय सुरू करणेबाबत व तद्नुषंगिक सर्व कामकाज पाहणेसाठी, आर्थिक तरतुदींचे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही करावी.

६. महाविद्यालयांच्या भांडवली प्रकल्प खर्चाचा हिशोब ठेवण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील. प्रस्तुत खर्च व महाविद्यालयाची प्रगती याबाबतचा अहवाल वेळोवेळी विद्यापीठ अनुदान आयोग व शासनास संबंधित विद्यापीठ सादर करेल.

७. इमारत बांधकाम व इतर तत्सम बाबींसाठी राज्य शासनाच्या हिश्श्याची/भांडवली खर्चाची रक्कम राज्य शासनाकडून विद्यापीठास उपलब्ध करून देण्यात येईल.

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येक महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज चालविण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी खालील समिती गठित करण्यात येत आहे. सदर समितीचे पुनर्गठन आवश्यकतेनुसार शासन स्तरावरून केले जाईल.

| | |
|---|---|
| १. कुलगुरू, संबंधित विद्यापीठ | - अध्यक्ष |
| २. विद्यापीठ अनुदान आयोगाने नामनिर्देशित केलेली व्यक्ती | - सदस्य |
| ३. राज्य शासनाने नामनिर्देशित केलेली व्यक्ती (संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण) | - सदस्य |
| ४. शिक्षण आणि उद्योग/व्यवसाय या क्षेत्रातील नामांकित/ तज्ज्ञ दोन व्यक्ती (या दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचा अधिकार कुलगुरूंचा राहील.) | - सदस्य |
| ५. संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य | - सदस्य सचिव |

## महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती

**प्रस्तावना—** शा. नि. क्र. संकीर्ण-१११९/(प्र.क्र.-८१/१६)/समन्वय/मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

तारीख १७ ऑक्टोबर २०१६ नुसार समिती स्थापना

महाराष्ट्राच्या वैचारिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक बांधणीत महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्या. रानडे अशा अनेक समाजधुरीणांचे योगदान आहे. या सर्वांना महाराजा सयाजीराव गायकवाड यांची थेट मदत होती. या सर्व समाजधुरीणांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. आजही महाराजा सयाजीराव गायकवाडांच्या कार्यकर्तृत्वाचा आणि राजकीय सामाजिक प्रयोगांचा नमुनादर्शक उपयोगी पडू शकतो. दोन वर्षांपूर्वी त्यांची १५० वी जयंती साजरी झाली आहे. महाराष्ट्र शासनाने राज्याच्या पुरोगामीत्वाची जडणघडण करण्यास प्रेरणादायी ठरलेल्या या आदिनेत्याची ओळख जागविण्यासाठी विशेष कृती प्रकल्प हाती घ्यावा या उद्देशाने महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना केली.

**समितीची उद्दिष्टे — महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीची सदस्य-सचिवांची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे :—**

(१) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे समग्र वाङमय प्रसिद्ध करून त्यांचे हिंदी, इंग्रजी आदि भाषांमध्ये भाषांतर करणे व प्रसिद्ध करणे.

(२) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अद्ययावत व सप्रमाण चरित्र लिहून हिंदी, इंग्रजी आदि भाषांमध्ये भाषांतर करणे व प्रसिद्ध करणे.

(३) जीवन कार्यावरील तसेच समीक्षापर साहित्य प्रकाशित करणे.

(४) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अप्रकाशित साहित्यांचे संकलन व संपादन करणे.

(५) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रकाशित साहित्याचे संशोधन करणे.

(६) शासन निर्णय क्रमांक डीबीए-२००८/(८६/०८)/समन्वय, दिनांक १८ ऑक्टोबर २००९ अन्वये सदस्य सचिवाच्या कामकाजाबाबत जी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आलेली आहेत. तीच मार्गदर्शक तत्त्वे या समितीच्या सदस्य सचिवांची राहील.

## राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना सन २०१३ मध्ये राज्यातील उच्च शिक्षण संस्थांना धोरणात्मक निधी पुरविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. राज्य शासनाने दिनांक २० मे २०१५ च्या शासन निर्णयानुसार राज्यात रुसा योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. केंद्र व राज्याचे निधीतील योगदानाचे प्रमाण ६०:४० असून हे प्रमाण मानके व फलनिष्पत्तीवर अवलंबून आहे. अधिक क्षमता, पारदर्शकता, जबाबदारी व प्रतिसादात्मकतेसह उच्च शिक्षणातील दर्जेदार संधी, समानता व उत्कृष्टता प्राप्त करणे हा उद्देश आहे.

## महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था

विद्यापीठे आणि उच्च व तंत्र शिक्षण भागाच्या अधिनस्त शिक्षकीय प्रवर्गातील अध्यापकांच्या व्यावसायिक क्षमतेचा प्रशिक्षणाद्वारे नियमित विकास करणे. उच्च शिक्षणामधील पारंपरिक प्रशिक्षण पद्धती बदलून कौशल्याधारित व उद्योगाभिमुख प्रशिक्षण पद्धती अवलंबिण्यासाठी अध्यापकांना प्रशिक्षित करणेबाबत. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा. नि. क्र. संदर्भ-२०१८/प्र. क्र. ३४४/मशि-५, दिनांक १३ सप्टेंबर २०१९ व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा. नि. क्र. संदर्भ-२०१८/प्र. क्र. ३४४/मशि.-५, दिनांक २४ फेब्रुवारी २०२० सदरची योजना सन २०२०-२१ पासून कार्यान्वित करण्यात येणार आहे.

तक्ता १

TABLE I

(दोन) वित्तीय आवश्यकता

तक्ता १

| तपशील<br>1 | प्रत्यक्ष खर्च (२०२०-२०२१)<br>Actuals (2020-2021)<br>2 | अर्थसंकल्प (२०२१-२०२२)<br>Budget Estimates (2021-2022)<br>3 |
|---|---|---|
| **२०४९--व्याज व प्रदाने-** | | |
| मागणी क्र. डब्ल्यू-१ | | |
| १. भविष्य निर्वाह निधीवरील व्याज | | |
| (१) अर्थसहाय्यिक अकृषिक विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक व सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी. (२०४९ ०९६९) | 204032 | 229619 |
| २. अर्थसहाय्यिक कला, वाणिज्य व शिक्षण महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी. (२०४९ ०९७८) | 1995635 | 2315363 |
| ३. अर्थसहाय्यिक शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अंशदानात्मक व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी. (२०४९ २३१७) | 8777 | 9182 |
| ४. (०१) (१) परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना (अनिवार्य) ४५ व्याज (२०४९ २५२२) | 1423763 | 1423763 |
| **२०४९--व्याज व प्रदाने एकूण-** | **3632207** | **3977927** |
| **२२०२-सर्वसाधारण शिक्षण-** | | |
| मागणी क्र-डब्ल्यू-२ | | |
| ए. कार्यभार वर्गीकरण-- | | |
| (२) ०२ माध्यमिक शिक्षण, शिक्षण प्रशिक्षण | 1033057 | 1862934 |
| ०३ विद्यापीठ व उच्च शिक्षण | | |
| (३) तांत्रिकेतर शिक्षणासाठी अकृषिक विद्यापीठांना साहाय्य | 6729344 | 8966588 |
| (४) शासकीय महाविद्यालये | 2055288 | 5319797 |
| (५) अशासकीय महाविद्यालयांना साहाय्य | 59565871 | 71224508 |
| (६) शिष्यवृत्या | 3929 | 18972 |
| (७) उच्च शिक्षण संचालक | 216875 | 267253 |
| (८) राज्य प्रशासकीय सेवा संस्था | 19161 | 55131 |
| (९) संशोधन संस्थांना साहाय्य | -- | 8900 |
| (१०) शिष्यवृत्त्या व सवलती | 456020 | 843519 |
| (११) भारीत | -- | 196 |
| **एकूण (ब) स्थूल ..** | 70079515 | 88567798 |
| वजा - वसुली .. | -- | -- |
| **एकूण (ब) निव्वळ ..** | 70079515 | 88567798 |

(B) Financial Requirements

TABLE I

(रुपये हजारात / Rs. in Thousands)

| सुधारलेले अंदाज (२०२१-२०२२) Revised Estimates (2021-2022) 4 | अर्थसंकल्प (२०२२-२०२३) Budget Estimates (2022-2023) 5 | Particulars 1 |
|---|---|---|
| | | **2049-Interest Payment- Demand No. w-1** |
| | | **1. Interest Providant Fund** |
| 229619 | 248330 | (1) Contributory Provident Fund of the Staff of Non-Agricultural Universities |
| 2135363 | 2711854 | (2) Contributory Provident Fund of the Employees of the aided Arts, Science, Commerce and Education Colleges |
| 9182 | 10804 | (3) Instrict on Provident Fund of Teaching and Non-Teaching staff of Government Physical Education Colleges |
| 1423763 | 1523200 | (4) (01) (01) Defined contributory Pension Scheme (Committed) 45 Interest. |
| **3797927** | **4494188** | **Total -- 2049 Interest Payments** |
| | | **2202- General Education— Demand No. w-2** |
| | | **A. Activity Classification —** |
| 1470443 | 1633370 | 2. 02-Secondary Education. 03-Universities and Higher Education. |
| 7770927 | 9251176 | 3. Assistance to Non-Agricultural Universities Non-Technical for Education. |
| 5034731 | 4797163 | 4. Government Colleges |
| 64956843 | 75595810 | 5. Assistance to Non-Government Colleges |
| 17026 | 18666 | 6. 107- Scholarships |
| 253238 | 290321 | 7. Direction and Administration |
| 52304 | 59336 | 8. State Institute of Administrative Careers |
| 107300 | 8500 | 9. Assistance to Research Institutions |
| 762196 | 934598 | 10. Scholarships And Concessions |
| 147 | 196 | 11. Charged |
| 80425155 | 92589136 | .. **Total (B) Gross.** |
| – | – | .. Deduct–Recoveries |
| 80425155 | 92589136 | .. **Total (B) Net** |

## नवीन समावेश Committed Expenditure Scheme यादी खालीलप्रमाणे

## अनिवार्य खर्च

क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र. ८८/अर्थ-१ वित्त विभाग, मंत्रालय, मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२, दिनांक २७ जानेवारी २०१७ नुसार सुधारणा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | योजनेचा सांकेतांक | गौणशीर्ष / उपशीर्ष |
|---|---|---|
| १ | २२०२ ०२९१ | शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये (अनिवार्य) |
| २ | २२०२ ०३०६ | अशासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना साहाय्य (अनिवार्य) |
| ३ | २२०२ ०३२४ | शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा विस्तार |
| ४ | २२०२ एच०६४ | शासकीय व अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकांकरिता प्रशिक्षण योजना (अनिवार्य) |
| ५ | २२०२ ०६८३ | सर्वसाधारण शिक्षणासाठी अकृषी विद्यापीठांचे वेतन |
| ६ | २२०२ ०७२७ | टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा विकास (अनिवार्य) |
| ७ | २२०२ ३४७७ | अमरावती विद्यापीठ परिसर विकास ३१ सहा. अनु. (वेतनेतर) |
| ८ | २२०२ ३४८६ | जळगाव येथील उ. महाराष्ट्र विद्यापीठाचा विकास (अनिवार्य) |
| ९ | २२०२ ३५२१ | सोलापूर येथील नवीन विद्यापीठाचा विकास (अनिवार्य) |
| १० | २२०२ ३५३९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचा विकास (अनिवार्य) |
| ११ | २२०२ एच५८१ | गोंडवाना विद्यापीठाची स्थापना (अनिवार्य) |
| १२ | २२०२ एच८०१ | विद्यापीठातील प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण (अनिवार्य) |
| १३ | २२०२ एच८१२ | शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विकास (अनिवार्य) |
| १४ | २२०२ ०७७२ | शासकीय कला महाविद्यालये (अनिवार्य) |
| १५ | २२०२ ०७८१ | शासकीय कला महाविद्यालयांचा विकास (अनिवार्य) |
| १६ | २२०२ ०७९२ | शासकीय विज्ञान महाविद्यालये (अनिवार्य) |
| १७ | २२०२ ०८०७ | शासकीय विज्ञान महाविद्यालयांचा विकास (अनिवार्य) |
| १८ | २२०२ ०८१६ | शासकीय विधी महाविद्यालये (अनिवार्य) |
| १९ | २२०२ ०८२५ | शासकीय विधी महाविद्यालयांचा विकास (अनिवार्य) |
| २० | २२०२ ०८३४ | शासकीय वाणिज्य महाविद्यालये (अनिवार्य) |
| २१ | २२०२ ०८४३ | शासकीय वाणिज्य महाविद्यालयांचा विकास (अनिवार्य) |
| २२ | २२०२ ०८५२ | विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचे परिरक्षण (अनिवार्य) |
| २३ | २२०२ ०८६१ | विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचा विकास (अनिवार्य) |
| २४ | २२०२ ०८७२ | अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालयांना अनुदाने (अनिवार्य) |
| २५ | २२०२ ०८९९ | डेक्कन महाविद्यालय, पुणे यांच्या विस्तारासाठी अनुदाने (अनिवार्य) |
| २६ | २२०२ १०११ | शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना साहाय्य (अनिवार्य) |
| २७ | २२०२ एच०७३ | राज्यातील सैनिकी शाळांशी संलग्न असलेली नवीन विज्ञान महाविद्यालये सुरू करणे (अनिवार्य) |
| २८ | २२०२ २६४१ | उच्च शिक्षण संचालक (अनिवार्य) |
| २९ | २२०२ २६५९ | उच्च शिक्षण संचालनालयाचे बळकटीकरण करणे (अनिवार्य) |
| ३० | २२०२ ११३३ | राज्य प्रशासनिक सेवा संस्था (अनिवार्य) |
| ३१ | २२०२ ११४२ | राज्य प्रशासन सेवा संस्था (अनिवार्य) |
| ३२ | २२०२ एच१०८ | शासकीय महाविद्यालयातील भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र उघडणे (अनिवार्य) |
| ३३ | २२०२ ११७१ | संशोधन संस्थांना साहाय्य (अनिवार्य) |
| ३४ | २२०२ २६१२ | संकीर्ण (भारित) |
| ३५ | २२०२ ०७४५ | सर्वसाधारण शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदान |

## नवीन समावेश Committed Expenditure Scheme यादी खालीलप्रमाणे

## कार्यक्रमावरील खर्च

| अ.क्र. | योजनेचा सांकेतांक | गौणशीर्ष / उपशीर्ष |
|---|---|---|
| १ | २२०२ ३१२७ | ज्युनिअर कॉलेजांना शिष्यवृत्त्या |
| २ | २२०२ ३४९५ | कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ नागपूर याचा विकास (वेतनेतर) |
| ३ | २२०२ ३५०१ | चंद्रपूर, रत्नागिरी, उस्मानाबाद येथील विद्यापीठांच्या उपकेंद्रांचा विकास |
| ४ | २२०२ ३५४८ | स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा विकास (वेतनेतर) |
| ५ | २२०२ जी ९५९ | विधी विद्यापीठाचा विकास |
| ६ | २२०२ एच ६५२ | मुंबई विद्यापीठाचा विकास |
| ७ | २२०२ आय ५०३ | मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक संस्थांचा विकास |
| ८ | २२०२ आय ५५९ | लोकनेते गोपीनाथ मुंडे ग्राम विकास व संशोधन संस्था, डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचा विकास. |
| ९ | २२०२ आय ५६८ | अकृषी विद्यापीठामध्ये एकात्मिक विद्यापीठ व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे |
| १० | २२०२ एच ०८२ | राज्यामध्ये शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था/महा. सुरू करणे |
| ११ | २२०२ ३५६६ | तालुक्याच्या ठिकाणी मुलींची वसतिगृहे (प्रियदर्शनी वसतिगृहे) सुरू करणे |
| १२ | २२०२ ३५७५ | ग्रामीण भागातील महाविद्यालयांचा दर्जा सुधारणे |
| १३ | २२०२ एच०४६ | विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम यांच्या कलम १२-बी अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना विकासासाठी अनुदाने. |
| १४ | २२०२ एच०५५ | एकूण पट नोंदणी प्रमाण कमी असलेल्या जिल्ह्यात एकूण पट नोंदणी प्रमाण वाढविण्यासाठी अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचा विकास. |
| १५ | २२०२ ०९३२ | महाविद्यालयातील ३४, शिष्यवृत्त्या / विद्यावेतने |
| १६ | २२०२ ०९४१ | दक्षिणा व इतर ३४, शिष्यवृत्त्या / विद्यावेतने |
| १७ | २२०२ ०९५२ | गुणवत्तापूर्वक विद्यार्थ्यांना सहा. ३४, शिष्यवृत्त्या / विद्यावेतने |
| १८ | २२०२ इ ७७८ | अल्पसंख्याकांसाठी समाजातील मुलांसाठी मॅट्रिकेतर शिष्यवृत्ती योजना (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) |
| १९ | २२०२ आय ०२२ | विनाअनुदानित कायमस्वरूपी विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाकडून आकारण्यात येणाऱ्या फीची निश्चितीकरण करण्यासाठी समिती स्थापन करणे. |
| २० | २२०२ ११८९ | संशोधन संस्थांना साहाय्य (केंद्र पुरस्कृत योजना) |
| २१ | २२०२ २८२८ | एकलव्य शिष्यवृत्ती योजना (राज्यस्तरीय योजना) |
| २२ | २२०२ १२६९ | हिंदी भाषेतील मॅट्रिकनंतरच्या अभ्यासासाठी हिंदी भाषिक नसलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकारच्या शिष्यवृत्त्या. |
| २३ | २२०२ एच ०९१ | शासकीय संशोधन शिष्यवृत्ती |
| २४ | २२०२ १४५६ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना<br>ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ६ लक्षपेक्षा अधिक नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी |
| २५ | २२०२ २७१२ | माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती |
| २६ | २२०२ २६९५ | स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती |
| २७ | २२०२ २७३९ | अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी प्रतिपूर्ती करणे |
| २८ | २२०२ आय ६६६ | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| २९ | २२०२ आय २६३ | राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान केंद्र ६० टक्के |
| ३० | २२०२ आय २७२ | राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान राज्य ४० टक्के |
| ३१ | २२०२ आय ५८६ | श्रीमती नाथीबाई ठाकरशी विद्यापीठ, मुंबई याचा विकास |
| ३२ | २२०२ आय ७१९ | शासकीय अध्यापकांसाठी प्रशिक्षण |

## शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये

**१. योजनेचे नाव** शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये (लेखाशीर्ष २२०२ ०२९१) (२२०२-०३२४)

**२. योजनेचा उद्देश** माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना पुरेशा प्रमाणात पदवीधर शिक्षण उपलब्ध करून देणे, तसेच व्यावसायिक क्षेत्रातील अध्यापन अर्हता संपादन करता यावी.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** राज्यामध्ये (१) मुंबई (२) रत्नागिरी (३) कोल्हापूर (४) पनवेल (५) औरंगाबाद (६) अंबाजोगाई, जिल्हा बीड (७) परभणी (८) नांदेड (९) अकोला (१०) बुलढाणा (११) यवतमाळ (१२) भंडारा या ठिकाणी शासकीय अध्यापक महाविद्यालये कार्यरत आहेत. आयएएसई चे दोन महाविद्यालये (१) शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालय व आयएएसई औरंगाबाद (२) एसएनडीटी महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, आयएएसई, पुणे.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे -** आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :-

(रुपये हजारांत)

| वर्ष | प्रवेश क्षमता | एकूण प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | अनिवार्य खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| प्रत्यक्ष सन २०२०-२१ | १४०० | ९०३ | ८२५ | ६२९ | २०८४२३ |
| अपेक्षित सन २०२१-२२ | १४०० | ११०१ | ८९७ | ६८८ | ३३६८३३ |
| अंदाजित-सन २०२२-२३ | १४०० | ११५४ | ९९७ | ७२२ | ३९१८८० |

## अशासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये

**१. योजनेचे नाव** अशासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये. (लेखाशीर्ष २२०२ ०३०६)

**२. योजनेचा उद्देश** माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना पुरेशा प्रमाणात पदवीधर शिक्षक उपलब्ध करून देणे. तसेच व्यावसायिक क्षेत्रातील अध्यापन अर्हता संपादन करता यावी.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** राज्यामध्ये एकूण २० जिल्ह्यांमध्ये ३८ अनुदानित महाविद्यालये आहेत. त्यांचे सहायक अनुदान (वेतन) व इतर प्रशासकीय बाबींसाठी विभागीय सहसंचालकांचे सनियंत्रण असते.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे,** आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :-

(रुपये हजारांत)

| वर्ष | महाविद्यालयांची संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १०० टक्के अनुदानित | अंशत: अनुदानित | विना अनुदानित | कायम विना अनुदानित | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | अनिवार्य खर्च |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| प्रत्यक्ष सन २०२०-२१ | ३८ | -- | -- | ४४१ | २९७५० | ८२४९३६ |
| अपेक्षित सन २०२१-२२ | ३८ | -- | -- | ४३१ | ३०५०० | ९९००५५ |
| अंदाजित-सन २०२२-२३ | ३८ | -- | -- | ४५० | ३१२५० | १०९३३६४ |

## माध्यमिक शाळेतील गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना साहाय्य

**१. योजनेचे नाव–** माध्यमिक शाळेतील गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना साहाय्य (लेखाशीर्ष-२२०२ ३१२७)

**२. योजनेचा उद्देश–** शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक एफइडी १०८३/१८१६३५(२३१७)/साशि-५/ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, दिनांक १७ मे १९८४ अन्वये राबविणेत येते. कनिष्ठ स्तर माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये वरचा क्रमांक मिळविणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत आर्थिक अडचणीमुळे बाधा पोहोचू नये म्हणून त्यांना आर्थिक साहाय्य देणे. या योजनेसाठी एकूण ९९ संच असून त्याची एकूण नऊ विभागीय मंडळांमध्ये प्रत्येकी ११ विद्यार्थी याप्रमाणे वितरित केले जातात.

१. सर्वसाधारण गुणवान यादीतून पहिले पाच विद्यार्थी.

२. गुणवत्तेनुसार पहिल्या तीन मुली

३. गुणवत्तेनुसार मागासवर्गातील विद्यार्थ्यांमधून पहिले तीन विद्यार्थी. या योजनेखाली शासनमान्य व अनुदानित कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये मान्य दराने आकारल्या जाणाऱ्या प्रवेश फी, शिक्षण फी, ग्रंथालय फी, जिमखाना फी, परीक्षा फी यांची प्रतिपूर्ती केली जाते. तसेच विद्यार्थी वसतिगृहात राहत असेल, तर वसतिगृह फी प्रत्येकी सत्रासाठी रुपये ३००, भोजन खर्च दरमाह रुपये १५०, वैद्यकीय खर्च प्रत्यक्ष किंवा वार्षिक रुपये १२० यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम, तसेच पुस्तकांसाठी साहाय्य दिले जाते.

**३. अंमलबजावणी यंत्रणा–** संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे-** आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च -

(रुपये हजारांत)

| वर्ष | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | अर्थसंकल्पीय (लाभार्थी) तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष सन २०२०-२१ | ९९+नूतनीकरण | ४९९८ | १५५ | २३ |
| अपेक्षित सन २०२१-२२ | १५६+नूतनीकरण | १५०० | १५०० | ६२ |
| अंदाजित सन २०२२-२३ | २५५+नूतनीकरण | १५०० | १५०० | १२२ |

## सर्वसाधारण शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदाने

१. **योजनेचे नाव–** सर्वसाधारण शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदाने. (लेखाशीर्ष २२०२ ०६८३)

२. **योजनेचा उद्देश–** महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक व प्रशासकीय कार्य क्षमतेने पार पाडण्यासाठी योग्य ते अधिनियम तयार करून उच्च शिक्षणाच्या निरनिराळ्या पातळ्यांवर सुयोग्य शिक्षणक्रम तयार करणे व ते कार्यक्षमतेने अमलात आणणे आणि शैक्षणिक दर्जा उंचावून तो अधिकाधिक संपन्न करण्यासाठी अभ्यासक्रमात योग्य त्या सुधारणा करणे.

३. **अंमलबजावणी यंत्रणा–** अशासकीय महाविद्यालयांसाठीच्या विविध शाखांसाठी अभ्यासक्रम तयार करण्याचे काम राज्यातील एकूण दहा अकृषिक विद्यापीठांमार्फत केले जाते. या विद्यापीठांमधील शासनमान्य शिक्षक व शिक्षकेतर पदांचे वेतनावरील खर्च राज्य शासनामार्फत केला जातो.

४. **योजनेची भौतिक उद्दिष्टे-** आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च -

(रुपये हजारांत)

| वर्ष | संलग्नित महा-विद्यालयांची संख्या | विद्यापीठीय परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची विद्या शाखानिहाय संख्या | | | | | विद्यापीठीय परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांची विद्या शाखानिहाय संख्या | | | | | विद्यापीठामधील निरनिराळ्या विभागामधील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या | दिलेले अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कला | वाणिज्य | विज्ञान | विधी | शिक्षण शास्त्र | कला | वाणिज्य | विज्ञान | विधी | शिक्षण शास्त्र | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| प्रत्यक्ष- सन-२०२०-२१ | ३२३१ | १०९३४६१ | ८६३७२६ | ५५५७०३ | ६४४३० | ६३२२३ | ९१५७४० | ७४२५१९ | ४८५६५१ | ५३५६५ | ५८४७३ | १२३८५ | ५३८०२७२ |
| अपेक्षित सन-२०२१-२२ | ३३१८ | ११९५३३० | ८९८२७५ | ५८३४८८ | ६६३६३ | ६३८५५ | ९३४०५५ | ७७२२२० | ५०९९३४ | ५४१०१ | ६०२२७ | १३७४७ | ७३४४७२१ |
| अंदाजित सन-२०२२-२३ | ३३१८ | ११९५३३० | ८९८२७५ | ५८३४८८ | ६६३६३ | ६३८५५ | ९३४०५५ | ७७२२२० | ५०९९३४ | ५४१०१ | ६०२२७ | १३७४७ | ७९९०१३१ |

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ , पुणे अभिमत विद्यापीठास साहाय्य

१. **योजनेचे नाव–** टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यास साहाय्य. (लेखाशीर्ष २२०२ ०७२७)

२. **योजनेचा उद्देश–** राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान व संस्कृत या विषयांवरील पदव्युत्तर शिक्षण देण्यासाठी ख्यातनाम शिक्षण तज्ज्ञांची (उदा. बाळ गंगाधर टिळक) यांनी सूत्रपात (Initiated) केलेली शैक्षणिक ध्येये साध्य करणे व वरील विषयांमध्ये समाजाला उपयुक्त शिक्षण देणे. सन १९८७ या वर्षी या विद्यापीठाला मानीव विद्यापीठ (Deemed University) म्हणून मान्यता दिलेली आहे.

३. **अंमलबजावणी यंत्रणा–** राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान व संस्कृत या विषयांवरील उच्च शिक्षणाबाबतचे अभ्यासक्रम तयार करण्याचे काम या विद्यापीठामार्फत केले जाते. तर या विद्यापीठामधील मान्य व शिक्षक व शिक्षकेतर पदांचे वेतनावरील खर्च तसेच वेतनेतर अनुदानावरील खर्च राज्य शासनामार्फत केला जातो.

४. **योजनेची भौतिक उद्दिष्टे-** आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च

(रुपये हजारांत)

| वर्ष | विद्यापीठांमधील निरनिराळ्या विभागांमधील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | | | | | | | विद्यापीठामधील निरनिराळ्या विभागांमधील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या | | | | | | | | दिलेले अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तात्त्विक आणि सामाजिक शास्त्रे विभाग | ग्रंथालय विभाग | संस्कृत महा-विद्यालय | आयुर्वेद महा-विद्यालय | दूर शिक्षण विभाग | शिक्षण शास्त्र | आधुनिक शास्त्रे आणि व्यवसाय कौशल्ये | मॅनेजमेंट | समाज-कार्य | तात्त्विक आणि सामाजिक शास्त्रे विभाग | ग्रंथालय विभाग | संस्कृत महा-विद्यालय | आयुर्वेद महा-विद्यालय | शिक्षण शास्त्र | आधुनिक शास्त्रे आणि व्यवसाय कौशल्ये | मॅनेजमेंट | समाज-कार्य | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| प्रत्यक्ष सन-२०२०-२१. | ८२ | -- | १४५ | १०४ | -- | -- | ६५७ | ४७७ | १४२ | २६ | -- | ०६ | १७ | -- | २२ | ३२ | १२ | २९७९६ |
| अपेक्षित सन-२०२१-२२. | ५४ | -- | १२४ | १०४ | -- | -- | ५७९ | ४१४ | १४९ | २६ | -- | ०६ | १७ | -- | २२ | ३२ | १२ | ५११९०८ |
| अंदाजित सन-२०२२-२३. | १०० | -- | १५० | १२० | -- | -- | ६५० | ५०० | १५० | २० | -- | ०८ | १८ | -- | २२ | ३० | १० | ६२०३४ |

## शासकीय कला महाविद्यालये

१. **योजनेचे नाव–** शासकीय कला महाविद्यालये (लेखाशीर्ष २२०२ ०७७२) (२२०२ ०७८१)

२. **योजनेचा उद्देश–** ब्रिटिशांच्या काळामध्ये उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ब्रिटिशांनी कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही विद्याशाखा असलेल्या महाविद्यालयांची स्थापना केली. स्वातंत्र्यपूर्व काळात उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून ब्रिटिशांनी (१) एलफिन्स्टन महाविद्यालय, मुंबई (२) ईस्माइल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी, मुंबई (३) राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर (४) शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद (५) विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती (६) वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर या राज्याच्या विविध भागात महाविद्यालये स्थापन केली.

३. **अंमलबजावणी यंत्रणा–** महाविद्यालयांचे/संस्थाचे व्यवस्थापन प्राचार्य/संचालक यांचेमार्फत या शिक्षण संचालनालयाच्या संनियंत्रणात केले जाते.

४. **योजनेची भौतिक उद्दिष्टे-** आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च

(रुपये हजारांत)

| वर्ष | प्रवेश क्षमता विद्यार्थ्यांची संख्या | | | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | संशोधन/पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या | झालेला खर्च अनिवार्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कला | वाणिज्य | विज्ञान | कला | वाणिज्य | विज्ञान | कला | वाणिज्य | विज्ञान | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| प्रत्यक्ष सन २०२०-२१. | ६५८० | ३७८० | ६२२० | ४७८६ | ३३३७ | ४७२० | ४०८८ | ३०१६ | ४२७९ | ६३७ | ८९३०४४ |
| अपेक्षित सन २०२१-२२. | ६५८० | ३७८० | ६९९० | ५७९१ | ३७६९ | ६१२६ | ४९९७ | ३२३३ | ५८०० | ६७५ | १२८०२५५ |
| अंदाजित सन २०२२-२३. | ७२२० | ३७८० | ६९९० | ६४३१ | ३७१० | ६३९६ | ५१०८ | ३३१७ | ५५५७ | ७२० | १३८५२५१ |

## शासकीय विज्ञान महाविद्यालये

१. **योजनेचे नाव–** शासकीय विज्ञान महाविद्यालये (लेखाशीर्ष २२०२ ०७९२) (२२०२ ०८०७)

२. **योजनेचा उद्देश–** वैज्ञानिक संशोधनाला उत्तेजन देता यावे या उदात्त दृष्टिकोनातून शासनाने मुंबई, नागपूर व औरंगाबाद येथे विज्ञान संस्थेची स्थापना केलेली आहे. विज्ञानामधील विविध प्रकारच्या शास्त्रीय क्षेत्रातील मौलिक संशोधन कार्य करावे अशी शासनाची अपेक्षा आहे. तसेच गडचिरोली या आदिवासी भागात एकही शासकीय महाविद्यालय नसल्याने तेथील विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेचे शिक्षण घेता यावे यासाठी गडचिरोली येथे विज्ञान महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे.

३. **अंमलबजावणी यंत्रणा–** महाविद्यालयांचे/संस्थांचे व्यवस्थापन प्राचार्य/संचालक यांचेमार्फत उच्च शिक्षण संचालनालयाच्या संनियंत्रणाखाली केले जाते.

४. **योजनेची भौतिक उद्दिष्टे-** आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च

(रुपये हजारांत)

| वर्ष | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | पीएचडी/संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या | झालेला खर्च अनिवार्य खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| प्रत्यक्ष सन- २०२०-२१ | २८३१ | २१७४ | १९५२ | १९०१ | ४३ | ३४६१७५ |
| अपेक्षित सन- २०२१-२२ | २८३१ | २२२८ | २२१२ | १९८७ | ९६ | ४८०३९३ |
| अंदाजित सन-२०२२-२३ | २८३१ | २४२९ | २३९६ | २३१४ | १३१ | ५८६३४६ |

## शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था

१. **योजनेचे नाव–** शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था (लेखाशीर्ष २२०२ H ०८२)

२. **योजनेचा उद्देश–** न्याय सहायक विज्ञानशास्त्रामध्ये प्रामुख्याने विषयशास्त्र, डी.एन.ए. चाचणी, क्षेपणशास्त्र, एन. चाचणी, क्षेपणशास्त्र चाचणी, सामान्य विश्लेषण, भौतिकशास्त्र, मानसशास्त्र व त्या अंतर्गत ब्रेन इलेक्ट्रॉनिक्स ॲसिलेशन (ब्रेन मॅपिंग) सिग्नेचर प्रोफायलिंग, नॉर्कोॲनालिसिस, भौतिकशास्त्रामध्ये सायबर फॉरेन्सिक हे महत्त्वाचे विषय येतात. या सर्व शास्त्रांचा उपयोग हा पोलीस यंत्रणेस गुन्ह्यामध्ये गुन्हेगाराचा शोध घेण्यासाठी व न्यायदानामध्ये न्यायसंस्थेला गुन्हेगाराविरुध्द गुन्हा शाबीत ठरविण्यासाठी होत असतो. गुन्ह्यामध्ये शास्त्र व तंत्रज्ञानाच्या वापराबरोबरच गुन्ह्याची क्षेत्रे बदललेली आहेत. यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याने डिजिटल व सायबर गुन्हे जसे इंटरनेट, क्रेडिट कार्डस्, मोबाईल, वेबसाईटस् पासवर्डस् इ. टेम्परिंग/हॅकिंगच्या माध्यमातून आर्थिक गुन्हे होण्याबरोबरच विध्वंसक कारवाया होत आहेत. यावर योग्य नियंत्रण मिळविण्यासाठी या संपूर्ण क्षेत्रामध्ये तज्ज्ञ असे शिक्षित मनुष्यबळ तयार करणे.

शासन निर्णय, क्रमांक एनजीसी-२००९/(१३४/०६) मशि-४, दिनांक १७ ऑगस्ट २००९ अन्वये शासनाने मुंबई व औरंगाबाद येथे शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. या न्याय सहायक विज्ञान संस्थेमध्ये (१) बी.एस्सी. (फॉरेन्सिक सायन्स)-३ वर्षे, (२) एम.एस्सी. (फॉरेन्सिक सायन्स) ५ वर्षे, (३) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन फॉरेन्सिक सायन्स १ वर्ष (४ कोर्सेस) अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष सन २००९-१० पासून परवानगी दिलेली आहे. तसेच शासन निर्णय, क्रमांक एनजीसी-२०११०/(२०)/(११)/माशि-४, २२ जुलै २०११ अन्वये शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था, नागपूर ही संस्था सुरू करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून परवानगी दिली आहे.

३. **अंमलबजावणी यंत्रणा–** महाविद्यालयांचे/संस्थांचे व्यवस्थापन प्राचार्य/संचालक यांचेमार्फत उच्च शिक्षण संचालनालयाच्या संनियंत्रणाखाली केले जाते. सध्या राज्यात ३ शासकीय न्याय सहायक संस्था कार्यरत आहेत.

१) शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था, मुंबई

२) शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था, औरंगाबाद

३) शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था, नागपूर

४. **योजनेची भौतिक उद्दिष्टे-** आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च

(रुपये हजारांत)

| वर्ष | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | झालेला खर्च कार्यक्रमावरील खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| प्रत्यक्ष सन २०२०-२१ | ८४० | ७४६ | ७३५ | ७१० | ११०५५६ |
| अपेक्षित सन २०२१-२२ | ८४० | ७८० | ७६० | ७६४ | १५१९३७ |
| अंदाजित सन २०२२-२३ | ८४० | ८२० | ८१६ | ७४७ | १८४१२७ |

## शासकीय विधी महाविद्यालये

१. **योजनेचे नाव-** शासकीय विधी महाविद्यालय .. (लेखाशीर्ष २२०२ ०८१६) (२२०२ ०८२५)

२. **योजनेचा उद्देश-** कायद्याचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त करून देऊन त्यांचेमार्फत चांगले विधिज्ञ तयार करून त्यांच्या ज्ञानाचा सर्वसामान्य जनतेला फायदा करून देण्यासाठी मुंबई येथे शासकीय विधी या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे.

३. **अंमलबजावणी यंत्रणा-** महाविद्यालयांचे व्यवस्थापन प्राचार्यांमार्फत या संचालनालयाच्या मार्गदर्शनानुसार केले जाते.

४. **योजनेची भौतिक उद्दिष्टे-** आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च

(रुपये हजारांत)

| वर्ष | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | अनिवार्य खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| प्रत्यक्ष सन २०२०-२१ | २१०० | २०८२ | २०४६ | १९३३ | ३२१३५ |
| अपेक्षित सन २०२१-२२ | २१०० | २०९२ | २०९२ | १९९४ | ३८२८१ |
| अंदाजित सन २०२२-२३ | २१०० | २१४४ | २१५४ | २०७४ | ४३६८० |

## शासकीय वाणिज्य महाविद्यालये

१. **योजनेचे नाव-** शासकीय वाणिज्य महाविद्यालये .. (लेखाशीर्ष २२०२ ०८३४) (२२०२ ०८४३)

२. **योजनेचा उद्देश-** वाणिज्य शाखेतील पदवी व पदव्युत्तर विषयाचे शिक्षण देण्यासाठी सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालयाची मुंबई येथे स्थापना करण्यात आली. वाणिज्य विषयाचे हे सर्वात जुने महाविद्यालय असून केवळ देशातीलच नव्हे तर परदेशातील विद्यार्थीही या संस्थेकडे प्रवेशासाठी आकृष्ट होतात. वाणिज्य विषयातील व्यवस्थापनशास्त्र या आणि त्या अनुषंगिक विषयाबाबतचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त करून देण्यासाठी सिडनहॅम व्यवस्थापकीय उद्योजकीय शिक्षण व संशोधन संस्था, मुंबई या संस्थेची स्थापना करण्यात आलेली असून या संस्थेमधून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये सर्वोच्च पदावर काम करीत आहेत.

व्यवस्थापन क्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देण्याचे काम या संस्थेतून केले जाते.

३. **अंमलबजावणी यंत्रणा-** महाविद्यालयांचे/संस्थांचे व्यवस्थापन प्राचार्यांमार्फत या शिक्षण संचालनालयाच्या संनियंत्रणानुसार केले जाते.

४. **योजनेची भौतिक उद्दिष्टे-** आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च

(रुपये हजारांत)

| वर्ष | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | अनिवार्य खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **प्रत्यक्ष सन २०२०-२१** | | | | | |
| कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर | ३००० | २७९६ | २७९६ | २७२८ | ६१०१४ |
| डी.बी.एम. ६६ | १३२ | ६१ | ६१ | ६० | |
| एम.एम.एस.२०८ | ४१६ | ३२४ | ३२४ | ३०२ | |
| **अपेक्षित सन २०२१-२२** | | | | | |
| कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर | ३००० | २६८१ | २६८१ | २६८१ | ९९२१८ |
| डी.बी.एम. | १३२ | ० | ० | ० | |
| एम.एम.एस. | ४१६ | ३८६ | ३८६ | ३५६ | |
| **अंदाजित सन २०२२-२३** | | | | | |
| कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर | ३००० | २७८१ | २७८१ | २७८१ | ११०५८९ |
| डी.बी.एम. | १३२ | ० | ० | ० | |
| एम.एम.एस. | ४१६ | ३९४ | ३९४ | ३८६ | |

## विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचे परिरक्षण

**१. योजनेचे नाव** – आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहे .. (लेखाशीर्ष २२०२ ०८५२) (२२०२ ०८६१)

**२. योजनेचा उद्देश** – उच्च शिक्षण घेण्यासाठी देशाच्या निरनिराळ्या भागातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने मुंबईत येत असतात. अशा मुलींची राहण्याची सोय होण्यासाठी शासनाने खास मुलींसाठी चर्नी रोड, मुंबई येथे सावित्रीदेवी फुले महिला वसतिगृह बांधलेले आहे.

तसेच सावित्रीदेवी फुले महिला छात्रालयामधील जागा अपुरी पडू लागल्यामुळे तेलंग स्मारक मुलांच्या वसतिगृहाचे रूपांतर मुलींच्या वसतिगृहात करण्यात आलेले आहे. तसेच मुंबईमधील प्रथितयश शासकीय महाविद्यालयामध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने प्रवेश घेत असतात. त्यांची मुंबईमध्ये राहण्याची सोय होण्यासाठी शासकीय महाविद्यालयात वसतिगृहाची स्थापना करण्यात आलेली आहे.

आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या बिकट परिस्थितीमुळे उच्च शिक्षण घेणे कठीण होते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांसाठी मोफत निवास व भोजनाच्या सवलती देणारी योजना शासनाने हाती घेतली आहे. अशा विद्यार्थ्यांकरिता आतापर्यंत राज्यात (१) बुधगाव जिल्हा सांगली (२) जव्हार, जिल्हा-पालघर (३) कोल्हापूर (४) बीड (५) यवतमाळ (६) नांदेड (७) अमरावती (८) शहादा, जिल्हा नंदुरबार (९) मालेगाव, जिल्हा नाशिक (१०) वर्धा (११) वरोरा, जिल्हा चंद्रपूर या ११ ठिकाणी विद्यार्थ्यांची राहण्याची व मोफत जेवणाची सोय करण्यात आलेली आहे.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे-१.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे** – आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :–

(रुपये हजारांत)

| वर्ष | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | अनिवार्य खर्च |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| प्रत्यक्ष सन २०२०-२१ .. | १७३० | २३३ | ४५३९८ |
| अपेक्षित सन २०२१-२२ .. | १७३० | ११४० | ७१६९९ |
| अंदाजित सन २०२२-२३ .. | १७३० | १५२५ | ८५०७७ |

# तालुक्याच्या ठिकाणी प्रियदर्शिनी मुलींची वसतिगृहे सुरू करणे

**प्रियदर्शिनी मुलींची वसतिगृहे —** प्रियदर्शिनी मुलींची वसतिगृहे. (लेखाशीर्ष २२०२ ३५६६)

भारताच्या माजी पंतप्रधान स्व. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्मरणार्थ सन २००० सालापर्यंत राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ५० ते १०० मुलींची सोय असलेली प्रियदर्शिनी वसतिगृहे सुरू करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला होता. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. टीडब्ल्यूएच १०९४/७१/मशि-४, दि. ३१ जुलै १९७५ मधील तरतुदीनुसार राज्यामध्ये स्वयंसेवी संस्थांमार्फत प्रियदर्शिनी वसतिगृह चालविण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे.

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण, क्र. वसति-२०१०/प्र.क्र.३०५/१०/मशि-२ दिनांक ५ जुलै २०१३ अन्वये प्रियदर्शिनी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थिनींना शासनाकडून देण्यात येणाऱ्या परिरक्षण (परिपोषण) भत्त्यात व वसतिगृह अधीक्षिकेच्या मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. प्रत्येक विद्यार्थिनींना दरमहा रुपये ९०० (शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांकरिता) व वसतिगृहाच्या अधीक्षिकेच्या मानधनात प्रति महिना रुपये ४५०० वाढ करण्यात आली आहे.

उच्च शिक्षण विभागाच्या अधिनस्त राज्यात विविध २१ ठिकाणी प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह सुरू करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | वसतिगृहाचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, शिरपूर, जिल्हा धुळे. | ५० |
| २. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, पाटण, जिल्हा सातारा. | ५० |
| ३. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ५० |
| ४. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, उस्मानाबाद, तालुका, जिल्हा उस्मानाबाद. | ५० |
| ५. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, आष्टी, जिल्हा बीड. | ५० |
| ६. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, कन्नड, जिल्हा औरंगाबाद. | ५० |
| ७. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, तालुका भोकरदन, जिल्हा जालना. | ५० |
| ८. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, वेंगुर्ला, तालुका वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग. | ५० |
| ९. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, भाग्यनगर, तालुका, जिल्हा नांदेड. | ५० |
| १०. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड. | १०० |
| ११. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, वसंतनगर, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड. | ५० |
| १२. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, चव्हाणवाडी, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड. | ५० |
| १३. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, अहमदपूर, जिल्हा लातूर. | ५० |
| १४. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, पुसद, जिल्हा यवतमाळ. | ५० |
| १५. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, घाटंजी, जिल्हा यवतमाळ. | ५० |
| १६. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, नेर परसोपंत, जिल्हा यवतमाळ | ५० |
| १७. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, पूर्णा, परभणी. | ५० |
| १८. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, कंधार, जिल्हा नांदेड. | ५० |
| १९. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, सिडको, जिल्हा नांदेड. | ५० |
| २०. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, लातूर, जिल्हा लातूर. | ५० |
| २१. | प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह, भोर, तालुका भोर, जिल्हा पुणे. | ५० |
| | एकूण | ११०० |

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे-१.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे** – आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :–

(रुपये हजारांत)

| वर्ष | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | कार्यक्रमावरील खर्च |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| प्रत्यक्ष सन २०२०-२१ .. | ११०० | ०० | ७०४० |
| अपेक्षित सन २०२१-२२ .. | ११०० | ७४३ | ८५१४ |
| अंदाजित सन २०२२-२३ .. | ११०० | ७४३ | ८५१४ |

## अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, विधी व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान

**१. योजनेचे नाव –** अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, विधी व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान.

**(लेखाशीर्ष २२०२ ०८७२)**

**२. योजनेचा उद्देश –** प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या सोयी विस्तृत प्रमाणावर उपलब्ध करून शिक्षणाला उत्तेजन देण्याचे शासनाचे धोरण आहे. शालेय पातळीवरील विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये वाढ होत असल्याने महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्याची संख्या वरचेवर वाढतच आहे. त्यामुळे विद्यार्थी संख्येत वाढ झाल्यामुळे अशा सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्राप्त करून देण्यासाठी महाविद्यालयांच्या संख्येत वरचेवर वाढच होत आहे. उच्च शिक्षणाच्या महाविद्यालयीन स्तरावर खाजगी संस्थांना अधिकाधिक वाव देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार कार्यरत आकृतीबंधातील मंजूर पदावर कार्यरत असलेल्या अध्यापक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाय्यक अनुदान या नियमान्वये सर्व महाविद्यालयांकरिता. सुधारित व समान अनुदान सूत्र सन १९७९-८० सालापासून लागू करण्यात आले आहे. त्यानुसार अशा १०० टक्के अनुदानित महाविद्यालयातील मान्य शिक्षक व शिक्षकेतर पदांचे वेतनावरील पूर्ण खर्च राज्य शासनामार्फत केला जातो. सन १९८३-८४ या वर्षापासून विनाअनुदान तत्त्वावर परवानगी दिलेल्या अशा महाविद्यालयांना मान्यता देण्यात आल्यानंतर पहिल्या ३ वर्षामध्ये कोणतेही अनुदान मंजूर करता येत नाही, शासन निर्णय क्रमांकएनजीसी १२७९/५७७९६ पस्तीस, दिनांक ३ ऑक्टोबर १९७९, शासन पत्र क्रमांक २५ सप्टेंबर १९७९ नुसार विद्यार्थी संख्येबाबतचे निकष पूर्ण करत असल्यास संबंधित महाविद्यालयांस ४ थ्या वर्षी २५ टक्के, ५ व्या वर्षी ५० टक्के, ६ व्या वर्षी ७५ टक्के आणि ७ व्या वर्षी १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. परंतु दिनांक १६ फेब्रुवारी २००४ च्या शासन निर्णयान्वये वेतनेतर अनुदान सूत्रामध्ये बदल करण्यात आलेला असून नवीन आदेशानुसार आता प्रत्येक वर्षी संबंधित महाविद्यालयांना दिलेल्या निव्वळ अदा केलेल्या मान्य शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतन अनुदानाच्या रकमेवर ५ टक्के एवढी रक्कम ५ व्या वेतन आयोगानुसार वेतनेतर अनुदान हे शिक्षण शुल्कापोटी जमा होणाऱ्या रकमेतून समायोजित करता येईल.

राज्यातील सर्व विभागांचा समतोल शैक्षणिक विकास व्हावा असे शासनाचे धोरण आहे. मागील काही वर्षात नक्षलग्रस्त भागात मुलींच्या महाविद्यालयीन शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प असल्याने उच्च शिक्षणातील महिलांचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थीनींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करून घेणे ही बाब शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या अत्यंत गरजेची आहे. नक्षलग्रस्त क्षेत्रातील मुलींचे एकूण नोंदणी गुणोत्तर राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे. नक्षलग्रस्त भागात कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरू असलेल्या व विहित निकष पूर्ण करणाऱ्या पाच महिला महाविद्यालयांना अनुदान देण्यात आले.

**३. अंमलबजावणी यंत्रणा –** राज्यामध्ये एकूण ३६ जिल्ह्यांमध्ये जवळजवळ ११७८ महाविद्यालये १०० टक्के अनुदानावर आहेत, त्यांचे वेतन व इतर प्रशासकीय बाबींसाठी दहा विभागीय कार्यालये १. मुंबई २. पनवेल ३. पुणे ४. कोल्हापूर ५. सोलापूर ६. जळगाव ७. औरंगाबाद ८. नांदेड ९. अमरावती १०. नागपूर सहसंचालक त्यावर आकृतीबंधातील मंजूर पदांवर कार्यरत असणाऱ्या अध्यापक / शिक्षकेतर कर्मचारी यांना सहायक अनुदान (वेतन) दिले जाते. हे संचालकांच्या वतीने काम पाहतात.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे** – आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च

(रुपये हजारात)

| वर्ष | | महाविद्यालयांची संख्या | | | प्रवेश दिलेल्या | दिलेले अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १०० टक्के अनुदानित | अंशत: अनुदानित | विना अनुदानित | कायम विना अनुदानित | विद्यार्थ्यांची संख्या | अनिवार्य खर्च |
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | .. | ११७८ | -- | ०८ | २०२६ | २६२७००९ | ५९२७३६९७ |
| अपेक्षित २०२१-२२ | .. | ११८२ | -- | ०६ | २१०३ | २६३५०७२ | ७०७५३६०८ |
| अंदाजित २०२२-२३ | .. | ११८७ | -- | ०४ | २२७० | २६४११३६ | ७७८४४०७६ |

## डेक्कन महाविद्यालय, पुणे यांच्या विस्तारासाठी अनुदाने

१. **योजनेचे नाव** – डेक्कन महाविद्यालय, पुणे याच्या विस्तारासाठी परिरक्षण अनुदाने. (लेखाशीर्ष २२०२ ०८९९)

२. **योजनेचा उद्देश** – डेक्कन महाविद्यालय पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे ही एक जुनी व आंतरराष्ट्रीय ख्यातीची शैक्षणिक संस्था असून सन १९३८-३९ मध्ये स्थापना झालेली आहे. या संस्थेमध्ये क्रम आणि भाषिक, ऐतिहासिक, वंशशास्त्र, संस्कृत, कोशशास्त्र व प्रायोगिक मानसशास्त्र विषयावर पदव्युत्तर अभ्यासक्रम, कार्य व गुणवत्तापूर्ण संशोधन केले जाते. ही संस्था प्रथम संशोधन संस्था असल्यामुळे या संस्थेमधील विशिष्ट प्रकल्पांसाठी भारत सरकार व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून अनुदान मिळते. या संस्थेत चालू वर्षी ११५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य शासनाकडून या महाविद्यालयास १०० टक्के वेतन अनुदान दिले जाते.

३. **अंमलबजावणी यंत्रणा** – या महाविद्यालयांमध्ये शिकविण्यात येणाऱ्या विविध विषयांसाठीचा अभ्यासक्रम या महाविद्यालयाद्वारेच ठरविण्यात येतो. या विद्यापीठामधील मान्य शिक्षक व शिक्षकेतर पदांचे वेतनावरील खर्च राज्य शासनामार्फत केला जातो. तसेच काही वेतनेतर अनुदानही मंजूर करण्यात येते.

(रुपये हजारात)

| वर्ष | विभागाचे नाव | संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या | शासकीय अनुदाने | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | राज्य शासन | विद्यापीठ अनुदान | इतर उत्पन्न |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | भाषाशास्त्र व संस्कृत शब्दकोश विभाग इतिहास (पुरातत्त्व विभाग) | ११८ | १३९९४८ | -- | ४९४०८ |
| अपेक्षित २०२१-२२ | | १४३ | १४९७४४ | ३६७ | ८९३९ |
| अंदाजित २०२२-२३ | | १५५ | १६४७०० | ४०३ | ९८३३ |

## अशासकीय अनुदानातील शारीरिक शिक्षण महाविद्यालय

**१. योजनेचे नाव** – शारीरिक शिक्षण (लेखाशीर्ष २२०२ १०११)

**२. योजनेचा उद्देश** – शारीरिक शिक्षण हा क्रीडा व युवकसेवा कल्याण संचालनालय, पुणे यांच्या अधिनस्त असलेला विषय शासन निर्णय क्रमांक शाशिम-४५१३/प्र.क्र.४६४/१३/आस्था-१, दिनांक १३ फेब्रुवारी २०१४ अन्वये उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदान उच्च शिक्षण संचालनालयामार्फत सन २०१४-१५ या वर्षापासून उच्च शिक्षण संचालनालयाचे अधिपत्याखालील विभाग सहसंचालकांमार्फत वितरित करण्यात येत आहे.

राज्यामध्ये ९ अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयांतील मान्यताप्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मंजूर पदांवर वेतन अनुदान देय आहे. ९ अशासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालयांत एकूण - २१६, शिक्षक - ११२, शिक्षकेतर - १०४ आहे.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय सहसंचालक हे त्यांच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचे सहायक अनुदान (वेतन) व इतर प्रशासकीय बाबीसाठी सहसंचालकांचे सनियंत्रण असते.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे** – आर्थिक तरतूद वर्षभरातील साध्य व झालेला खर्च

(रुपये हजारात)

| वर्ष | | महाविद्यालयांची संख्या | | | | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | दिलेले अनुदान अनिवार्य खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १०० टक्के अनुदानित | अंशतः अनुदानित | विना अनुदानित | कायम विना अनुदानित | | |
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | .. | ०९ | -- | -- | ४७ | ५२५० | १७९६१५ |
| अपेक्षित २०२१-२२ | .. | ०९ | -- | -- | ४७ | ५५०० | २७४४५० |
| अंदाजित २०२२-२३ | .. | ०९ | -- | -- | ४७ | ६००० | २६४४८८ |

## महाविद्यालयातील सर्वसाधारण शिष्यवृत्त्या

**१. योजनेचे नाव** – महाविद्यालयातील सर्वसाधारण शिष्यवृत्त्या .. (लेखाशीर्ष २२०२ ०९३२)

**२. योजनेचा उद्देश** – या योजनेसाठी मंजूर असलेल्या एकूण तरतुदीमधून एकूण ३ प्रकारच्या शिष्यवृत्त्या मंजूर केल्या जातात त्या खालीलप्रमाणे,

**(१) राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती** – शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एससीएच १०६३/यू, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दिनांक ०४ जून १९६४ व १६ नोव्हेंबर १९६४ अन्वये राज्य शासनाने खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना सुरू केली. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून शासनाकडून ही शिष्यवृत्ती दहा महिन्यांकरिता मंजूर केली जाते. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामधून प्रतिवर्षी पदवी परीक्षेपर्यंत व विधी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यास त्यासाठी जादा दोन वर्षांपर्यंत दिली जाते. ह्या शिष्यवृत्तीचा दर रुपये १०० दरमहा आहे. यासाठी एकूण संच १२०८ आहेत.

**(२) गणित व भौतिकशास्त्र विषयातील शिष्यवृत्ती** – शासन निर्णय, क्रमांक शिक्षण-२, क्रीडा व समाजकल्याण विभाग क्रमांक एससीएच १४७०/१०७५७२/एस, दिनांक १४ मे १९७१. गणित व भौतिकशास्त्र या विषयात प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे.

विभागीय मंडळाच्या उच्च माध्यमिक परीक्षेत ज्यांना कमीत कमी ६० टक्के गुण मिळाले आहेत, तसेच गणित व भौतिकशास्त्र या विषयात ६० टक्केपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत अशा विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ह्या शिष्यवृत्तीचा दर रुपये १०० दरमहा आहे.

**(३) शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्त्या** – शासन निर्णय, क्रमांक शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग, क्रमांक एससीएच १४७०/१०७५७२/एस, दिनांक १४ मे १९७१. शासनाच्या पुसेगाव, धुळे, औरंगाबाद व अमरावती या विद्यानिकेतनातून सदर परीक्षेमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या प्रत्येक विद्यानिकेतनामधील विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. प्रत्येकी २० प्रमाणे एकूण ८० संच कायमस्वरूपी मंजूर करण्यात आले आहेत.

**३. अंमलबजावणी यंत्रणा –** संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे–** आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :--

(रुपये हजारात)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | .. | १३८८+नूतनीकरण | ३०५४ | २४६ | २७८ + नूतनीकरण |
| अप्रत्यक्ष २०२१-२२ | .. | २२३३+नूतनीकरण | ३०५४ | १३८८ | १३८८ + नूतनीकरण |
| अंदाजित २०२२-२३ | .. | ३१००+नूतनीकरण | २७७६ | २७७६ | २७७६ + नूतनीकरण |

# सर्वसाधारण शिष्यवृत्त्या व अधिछात्रवृत्ती

**१. योजनेचे नाव** – सर्वसाधारण शिष्यवृत्त्या व अधिछात्रवृत्ती .. (लेखाशीर्ष २२०२ ०९४१)

**२. योजनेचा उद्देश** – शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एससीएच १०६५-यू, दिनांक १९ सप्टेंबर १९६५. पदव्युत्तर शिक्षणासाठी विद्यापीठातून व शासकीय कला, वाणिज्य व विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रतिवर्षी ही शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीचे एकूण ७६ संच असून, हे वरील महाविद्यालये व विद्यापीठे यांचेमध्ये विभागून दिले जातात. ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविलेली आहे ते विद्यार्थ्यी पहिल्या वर्षी या शिष्यवृत्तीस पात्र ठरतात. महाविद्यालयातील प्राचार्य किंवा विद्यापीठे ही अधिछात्रवृत्ती प्रदान करतात. ही छात्रवृत्ती दोन वर्षापर्यंत चालू राहते. दुसऱ्या वर्षी या छात्रवृत्तीचे विद्यार्थ्याच्या अभ्यासक्रमातील समाधानकारक प्रगतीवर नूतनीकरण करण्यात येते. या शिष्यवृत्तीचा दर रुपये २५० दरमहा इतका आहे.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे** – आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :--

(रुपये हजारात)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | .. | ७६+नूतनीकरण | ४१८ | ०० | ०० |
| अप्रत्यक्ष २०२१-२२ | .. | ८०+नूतनीकरण | ४१८ | १९० | ७६ |
| अंदाजित २०२२-२३ | .. | १०१+नूतनीकरण | ३८० | ३८० | १५२ |

## सर्वसाधारण शिष्यवृत्त्या, गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना साहाय्य

**१. योजनेचे नाव –** गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य योजना. (लेखाशीर्ष २२०२ ०९५२)

**२. योजनेचा उद्देश –** शिक्षण व सेवायोजन विभाग, शा. नि. क्र. एफइडी-१०८३/१८१६६३५ (२३१७)/साशि-५, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दिनांक १७ मे १९८४ अन्वये **वरिष्ठ स्तर** माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये वरचा क्रमांक मिळविणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत आर्थिक अडचणींमुळे बाधा पोहोचू नये म्हणून आणि त्यांना गुणवत्ता वाढविणे शक्य व्हावे व त्यायोगे त्यांच्या बुद्धीमत्तेचा फायदा समाजास व राज्यास व्हावा यासाठी अशा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य देण्यासाठी ही योजना शासन राबवीत आहे. ह्या योजनेमधून एकूण नऊ विभागांतून एकूण १३५ विद्यार्थ्यांना ह्या सवलतीचा लाभ देण्यात येतो. या योजनेखाली शासनमान्य व अनुदानित महाविद्यालयांमध्ये आकारल्या जाणाऱ्या प्रवेश फी, जिमखाना फी व परीक्षा फी इ. ची प्रतीपूर्ती केली जाते. तसेच विद्यार्थी वसतिगृहात राहत असतील तर वसतिगृह फी प्रत्येक सत्रासाठी रुपये ३००, भोजन खर्च रुपये १५० दरमहा तसेच वैद्यकीय खर्चापैकी प्रत्यक्ष खर्च किंवा रुपये १२० यापैकी जी रक्कम कमी असेल, तेवढी रक्कम तसेच पुस्तकांसाठी साहाय्य दिले जाते. कनिष्ठ व वरिष्ठ स्तर मिळून एकूण २०८ संच मंजूर आहेत.

**३. अंमलबजावणी यंत्रणा –** संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**४. योजनेची भौतिक उद्दीष्ट्ये –** आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :-

(रुपये हजारात)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | .. | १३५ + नूतनीकरण | ८००० | ९५१ | २३ |
| अप्रत्यक्ष २०२१-२२ | .. | २१३ + नूतनीकरण | ८००० | ५१७० | ८१ |
| अंदाजित २०२२-२३ | .. | ३४८ + नूतनीकरण | ८०१० | ५२०० | १३५ |

## उच्च शिक्षण संचालनालय

**१. योजनेचे नाव** – उच्च शिक्षण संचालक .. (लेखाशीर्ष २२०२ २६४१) (२२०२ २६५९)

**२. योजनेचा उद्देश** – उच्च शिक्षणाबाबतचे वाढत जाणारे कार्य तसेच महत्त्वाच्या प्रशासकीय आर्थिक व विशेष प्रकारच्या शैक्षणिक बाबी लक्षात घेऊन आणि उच्च शिक्षणाचा झपाट्याने होत असलेला विकास लक्षात घेऊन उच्च शिक्षण संचालनालयाची स्थापना करण्यात आली. राज्यात वाढती विद्यार्थी संख्या व त्या अनुषंगाने वाढत असलेली विद्यापीठे/महाविद्यालये पर्यायी अशासकीय अनुदानित महाविद्यालये, विद्यापीठे यामध्ये होणारी कर्मचाऱ्यांची वाढ व विस्तार विचारात घेत उच्च शिक्षण संचालनालयाने उन्नतीकरण करून एकूण १० विभागीय कार्यालयांची स्थापना करण्यात आलेली आहे. या कार्यालयाकडून अशासकीय महाविद्यालयांच्या संदर्भातील सर्व कामे करण्यात येतात.

शासन निर्णय, क्रमांक युएसजी-१४९३/(२६)/मशि-२, दिनांक १७ मे १९९४. राज्यातील अकृषीक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. तथापि, या संस्थांच्या नियंत्रणाच्या दृष्टीने उच्च शिक्षण संचालनालयातील कर्मचारीवर्गात आवश्यक ती वाढ झालेली नाही. शासनाच्या शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी व राज्यातील उच्च शिक्षण संस्था सुरळीतपणे चालू राहाव्या यासाठी प्रशासनाने संनियंत्रण व पर्यवेक्षणाच्या दृष्टीने उच्च शिक्षण संचालनालयाचे बळकटीकरण करण्यात आले.

**विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या-**

१. प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख म्हणून कामकाज पाहणे व त्याप्रमाणे प्रादेशिक विभाग प्रमुख विहित असलेल्या/प्रदान करण्यात आलेले वित्तीय तथा प्रशासकीय अधिकारांचा अंमल करणे.

२. विभागांतर्गत सर्व संलग्नित असणाऱ्या अशासकीय अनुदानित कला, विज्ञान व वाणिज्य आणि अध्यापक महाविद्यालयांना, तसेच उच्च शिक्षण संस्थांना अनुदान मंजूर करणे (वेतन वेतनेत्तर परिरक्षण अनुदान).

३. अकृषीक विद्यापीठांच्या विविध समित्यांवर शासनाचा / शिक्षण संचालनालयाचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहणे.

४. अशासकीय अनुदान प्राप्त कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षण महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा कार्यभार तपासून शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या अनुज्ञेयतेस मंजुरी देणे.

५. विभागातील अशासकीय महाविद्यालये/संस्था/विद्यापीठास आवश्यकतेनुसार भेट देणे.

६. नवीन महाविद्यालयांच्या प्रस्तावांना विहित आराखड्याप्रमाणे (मास्टर प्लॅन) छाननी करून परवानगी देण्याबाबत शिफारस करणे.

७. अशासकीय महाविद्यालयांच्या परवानगी, नुतनीकरणाच्या व विस्ताराच्या प्रस्तावांची छाननी करून त्याबाबत शिफारस करणे.

८. नवीन विद्याशाखा/तुकड्या/विषय सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावांना छाननी करून त्याबाबत शिफारस करणे.

९. अनुदानाचे विहित निकष पूर्ण करणाऱ्या विना अनुदानातील अशासकीय महाविद्यालयांना/विद्याशाखा/तुकड्या यांना विषय प्रथमत: अनुदान तत्त्वावर आणण्यासाठी प्रस्तावाची छाननी करून त्याबाबत शिफारस करणे.

१०. अकृषीक विद्यापीठांतील/संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांचे भविष्यनिर्वाह निधीतून अग्रीम मंजूर करणे, अंतिम प्रदान करणे तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या भविष्यनिर्वाह निधी अंतिम प्रदानास मंजुरी देणे.

११. अशासकीय महाविद्यालये/अकृषीक विद्यापीठांतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर करणे.

## सहपत्र ‘ ब ’

## विभागीय शिक्षण, सहसंचालक (उच्च शिक्षण) यांच्या कार्यालयातील प्रशासन अधिकारी (उच्च शिक्षण अनुदान) यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

(१) अकृषीक विद्यापीठ व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये यांचे वेतन तथा वेतनेतर अनुदानाचे निर्धारण करणे.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ व त्यांच्या अधिपत्याखालील १० विभागीय कार्यालये (१) मुंबई, (२) पुणे, (३) कोल्हापूर, (४) जळगाव, (५) औरंगाबाद, (६) नांदेड, (७) अमरावती, (८) नागपूर, (९) कोकण विभाग, पनवेल, (१०) सोलापूर.

---

## राज्य प्रशासनिक सेवा संस्था

**१. योजनेचे नाव** – राज्य प्रशासनिक सेवा संस्था ..(लेखाशीर्ष २२०२ ११३३) (२२०२ ११४२) (२२०२ H १०८)

**२. योजनेचा उद्देश** – आय.ए.एस. इत्यादी परीक्षा केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे आयोजित केल्या जातात. या परीक्षांकरिता महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण नगण्य दिसून आल्याने, महाराष्ट्रात जास्तीत जास्त विद्यार्थी या परीक्षांना उत्तीर्ण व्हावे हा हेतू विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळावे व वरील स्पर्धात्मक परीक्षा देणे संबंधित विद्यार्थ्यांना सुलभ होईल, यासाठी महाराष्ट्रात प्रथमत: १९७६ मध्ये मुंबई येथे राज्य व्यवसाय शिक्षण संस्था स्थापन केली. त्याच धर्तीवर शासन निर्णय, आय.ए.एस.१०८४/२८६०७/(६१/८४) विशि-१, दिनांक ३० सप्टेंबर १९८५ नुसार नागपूर, औरंगाबाद व कोल्हापूर या तीन ठिकाणच्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आलेली आहेत. तसेच शासन निर्णय, क्रमांक आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यात आली आहेत. तसेच शासन निर्णय क्रमांक आय. ए. एस-२००९/प्र.क्र. ३५/ ०९/मशि-२, दिनांक १७ जून २०१३ अन्वये नाशिक व अमरावती येथे नव्याने २ प्रि.आय.ए. ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यात आली आहेत.

शासन निर्णय, क्रमांक प्रि.आय. ५४१३/प्र.क्र. २१४/१३/मशि-२, दिनांक २८ जानेवारी २०१३ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेकडून उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारितील प्रत्येक भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षणासाठी प्रायोजित करण्यात आलेल्या अनुसूचित जातीच्या १० विद्यार्थ्यांना पुढील सत्रापासून खालील अटींवर प्रवेश देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

१. राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, अमरावती, नाशिक येथे त्या केंद्राच्या निर्धारित प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव १० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

२. सदर विद्यार्थी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, अमरावती, नाशिक यांनी घेतलेल्या C.E.Y. मधून निवडलेले असावेत.

३. सदर संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये २,००० प्रतिमाह प्रमाणे वार्षिक एकूण रुपये २४,००० रक्कम विद्यावेतन म्हणून व प्रती विद्यार्थी प्रतिवर्ष रुपये ५,००० एवढी रक्कम कार्यालयीन खर्च म्हणून त्यात वेळोवेळी होणाऱ्या वाढीसह बार्टी ही संस्था त्या त्या भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रास देईल.

४. सदर विद्यार्थ्यांची भोजनाची व्यवस्था करणे प्रशिक्षण केंद्रावर बंधनकारक राहणार नाही. वसतिगृहामधील जागा रिक्त असल्यासच विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार व वसतिगृहाच्या प्रवेश नियमांचे अधीन राहून या विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था करण्यात येईल.

५. शासन निर्णय, दिनांक १६ एप्रिल २०१६ अन्वये, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या राज्यातील उमेदवारांसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना मंजूर करण्यात आलेली

आहे. सदर योजनेनुसार मागील तीन वर्षांत किमान एकवेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्या परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहचलेल्या, तथापि, भारतीय प्रशासकीय सेवेत निवड न झालेल्या व कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये १०.०० लक्ष इतक्या मर्यादित असलेल्या उमेदवारास भाग-१ (पूर्व परीक्षा ते मुलाखत), भाग-२ (मुख्य परीक्षा) व भाग-३ (मुलाखत) याप्रमाणे दिल्ली येथील नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेण्याकरिता प्रशिक्षणाचा खर्च या स्वरूपात शिष्यवृत्ती अनुज्ञेय आहे. तसेच सदर उमेदवारांना दिल्ली येथील त्याच्या प्रशिक्षणाच्या वास्तव्याच्या कालावधीसाठी रुपये १०,००० प्रतिमाहप्रमाणे निर्वाह भत्तासुद्धा अनुज्ञेय आहे.

६. शासन निर्णय, दिनांक १३ नोव्हेंबर २०१७ अन्वये सदर योजनेतील लाभार्थी उमेदवारांना दिल्ली येथील श्रीराम आय.ए.एस. या खाजगी संस्थेस कॅलेंडर वर्ष २०१७ व २०१८ करिता मान्यता देण्यात आली आहे.

७. केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या राज्यातील उमेदवारांची मुलाखतीची तयारी करण्यासाठी सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षांमध्ये दिल्ली येथे अभिमत मुलाखत केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**३. अंमलबजावणी यंत्रणा –** या संस्थांचे व्यवस्थापन संचालकांमार्फत या संचालनालयाच्या मार्गदर्शनानुसार केले जाते.

**४. योजनेची भौतिक उद्दीष्ट्ये –** आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :-

(रुपये हजारात)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | प्रत्यक्ष खर्च अनिवार्य खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | .. | ५१० | ५५२१९ | २८१७५ | ५१० |
| अपेक्षित २०२१-२२ | .. | ५१० | ५५१३९ | ५५१३९ | ५१० |
| अंदाजित २०२२-२३ | .. | ५१० | ७०४४४ | ७०४४४ | ५१० |

| वर्ष | | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | परिक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| २०२०-२१ | | | | | |
| पूर्व परीक्षा | .. | ५१० | ३५० | ३४० | ७४ |
| मुख्य परीक्षा | .. | २८० | १३१ | १२५ | २३ |
| २०२१-२२ | | | | | |
| पूर्व परीक्षा | .. | ५१० | ३६० | ३५० | १५५ |
| मुख्य परीक्षा | .. | २८० | १७२ | १६५ | ६७ |
| २०२२-२३ | | | | | |
| पूर्व परीक्षा | .. | ५१० | ३६० | ३५० | २२० |
| मुख्य परीक्षा | .. | २८० | २२५ | २१५ | ११३ |

## संशोधन संस्थांना अनुदान

**१. योजनेचे नाव** – संशोधन संस्थांना अनुदान. .. (लेखाशीर्ष २२०२ ११७१) (२२०२ ११८९)

**२. योजनेचा उद्देश** – विशिष्ट विषयांमध्ये संशोधन करण्यात तसेच अनौपचारिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या बाबतीत राष्ट्रीय संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी संशोधन करण्यात संस्थांना शासनाकडून अनुदान दिले जाते.

१. **भारतीय शिक्षण संस्था, पुणे--** (अ) राष्ट्रीय विकासाबरोबर शिक्षण देणे, (ब) सामाजिक विज्ञान आंतर विद्याशाखीय एम. फिल व पी.एच.डी. स्तरावर संशोधन करणे, (क) समाजातील विशेष घटकांसाठी संशोधन व कृती संशोधन प्रकल्प हाती घेवून मूलभूत शिक्षण स्तरावरील गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे

२. **कैवल्यधाम श्रीमान माधव योग मंदिर समिती, लोणावळा, जिल्हा पुणे--** या संस्थेच्या तीन विभागांना एकूण खर्चाच्या ८०% अनुदान केंद्र शासनाकडून व २०% अनुदान राज्य शासनाकडून मंजूर करण्याचे धोरण होते.
आर्थिक वर्ष २०२२-२३ पासून केंद्र शासनाने वितरीत केलेल्या अनुदानाच्या २५% किंवा जास्तीत जास्त ३७.६ लक्ष इतक्या मर्यादेत अनुदान मंजूर करण्यात येईल.

३. **वैदिक संशोधन संस्था, पुणे--** वेदविषयक संशोधन करून पुस्तके प्रकाशित करणे, हस्त लिखिते गोळा करणे व जपणूक करून त्याचे प्रकाशन करणे, वेदांच्या विचारांचा व मूल्यांचा समाजामध्ये प्रचार करणे.

४. **टाटा मूलभूत संशोधन संस्था, मुंबई--** सायन्स, मॅथेमेटिक आणि मायक्रोबायॉलॉजीमध्ये मूलभूत संशोधन करणे.

५. **महात्मा जोतिराव फुले विश्वभारती संस्था, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर--** या संस्थेस देण्यात येत असलेले वार्षिक अनुदान रुपये १५०००/- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापासून शासन स्तरावरून बंद करण्यात आले आहे.

६. **भांडारकर पौर्वात्य प्राच्य विद्या संशोधन संस्था, पुणे--** (अ) इतिहास संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधनास सहाय्य करणे, (ब) त्यासाठी संस्थांचे ग्रंथालय उपलब्ध करून देणे, (क) शास्त्रीय पध्दतीने विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रशिक्षित करणे. त्याचप्रमाणे त्यांचेसाठी पदव्युत्तर वर्ग घेणे व उच्च प्रकारच्या संशोधनासाठी त्यांची वेळेत तयारी करून घेणे (ड) निरनिराळ्या संशोधकांना शास्त्रीयपदवीसाठी तयारी करणाऱ्यांना मदत करणे, त्यांना मार्गदर्शन करणे व त्यांची तयारी करून घेणे.

संस्था भारतीय पश्चिम विभाग मंडळ, भारतीय शिक्षण संस्था, पुणे, अशा काही संस्थांना या योजनेद्वारा अनुदान दिले जाते. तसेच काही संस्थांना त्यांनी केलेल्या मान्य खर्चावर २५ टक्के किंवा रुपये १५,००० च्या मर्यादेपर्यंत आर्थिक मदत किंवा साहाय्य देण्यात येते.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे**– आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :--

(रुपये हजारात)

| वर्ष | संशोधन संस्थांची संख्या | संशोधन करणाऱ्या विद्वान अथवा भेट देऊन त्यांचा उपयोग करून घेणाऱ्यांची संख्या | अनिवार्य | कार्यक्रमावरील खर्च | योजनेवरील खर्च अनुदान दिलेल्या संशोधन संस्थांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | ६ | ४१० | -- | ०० | ५ |
| अपेक्षित २०२१-२२ | ६ | ४३० | -- | १०४९०० | ४ |
| अंदाजित २०२२-२३ | ६ | ४६० | -- | ९००० | ४ |

## हिंदी भाषेतील मॅट्रिकनंतरच्या अभ्यासासाठी अहिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकारच्या शिष्यवृत्या

**१. योजनेचे नाव** – हिंदी भाषेतील मॅट्रिकनंतरच्या अभ्यासासाठी अहिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकारच्या शिष्यवृत्या. .. (लेखाशीर्ष २२०२ १२६९)

**२. योजनेचा उद्देश** – हिंदी भाषिक नसलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांना हिंदी शिक्षणासाठी प्रोत्साहन म्हणून ही शिष्यवृत्ती योजना देण्यात येते. एकूण २५५ संच मंजूर आहेत. ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. सन १९८४-८५ पासून राज्यात सुरू होती. सदर योजनेचे केंद्र शासनाकडून मूल्यांकन अभ्यास सुरू असल्याने सद्य:स्थितीत बंद आहे. केंद्र शासनाकडून पुढील आदेश प्राप्त झाल्यावर सुरू होईल.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे**– आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :--

(रुपये हजारात)

| वर्ष | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | ० | १०० | ०० | ० |
| अपेक्षित २०२१-२२ | ० | १०० | ०० | ० |
| अंदाजित २०२२-२३ | ० | ० | ०० | ० |

## एकलव्य शिष्यवृत्ती योजना

**१. योजनेचे नाव** – एकलव्य शिष्यवृत्ती योजना .. (लेखाशीर्ष २२०२ २८२८)

**२. योजनेचा उद्देश** – उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एससीएच-१०९५/(८१)/मशि-४, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, दिनांक ७ फेब्रुवारी १९९६ पासून सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील बुध्दिमान मुलांना पदव्युत्तर शिक्षणाची सोय तालुक्याच्या ठिकाणी किंवा काही विषयाच्या बाबतीत जिल्ह्यांच्या ठिकाणी अथवा विद्यापीठ असलेल्या शहरांमध्ये जाऊन पदव्युत्तर शिक्षण घेऊ शकत नाही अशा गुणी बुध्दीमान विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांची आर्थिक कुवत नसल्यामुळे पदव्युत्तर शिक्षणापासून वंचित राहू लागू नये व त्यांना पदव्यूत्तर शिक्षण घेता यावे की जेणेकरून राज्यातील मनुष्यबळाचा योग्यप्रकारे विकास घडून येऊ शकेल यादृष्टीने बुध्दीमान विद्यार्थ्यांना पुरेसे आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये प्रति वर्ष रुपये ५००० इतकी रक्कम देतात.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे**– आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च –

(रुपये हजारात)

| वर्ष | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | १५००० | १०००० | २३७० | ६०६ |
| अपेक्षित २०२१-२२ | १५००० | ८००० | ६२०० | १२४० |
| अंदाजित २०२२-२३ | १५००० | ४००० | ४००० | ८०० |

## स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती

**१. योजनेचे नाव** – स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती .. (लेखाशीर्ष-२२०२ २६९५)

**२. योजनेचा उद्देश** – शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक एनडीएफ-२००४/(६१३/०४)/केंपुयो मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, दिनांक २५ ऑक्टोबर २००४. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी कारावास भोगला अशा स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नींना, मुलांना, नातवंडांना ही सवलत दिली जाते. या सवलती शैक्षणिक क्षेत्रातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण अशा सर्व स्तरावर दिल्या जातात. या योजनेला उत्पन्न मर्यादेची अट नाही.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), मुंबई, पुणे, कोल्हापूर, जळगाव, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर, कोकण विभाग, पनवेल, सोलापूर.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे**– आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च –

(रुपये हजारात)

| वर्ष | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | ५० | ५० | ०० | ४५ |
| अपेक्षित २०२१-२२ | ५० | १० | १० | ४५ |
| अंदाजित २०२२-२३ | ५० | १० | १० | ५० |

---

## अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी प्रतिपूर्ती करणे

**१. योजनेचे नाव** – अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी प्रतिपूर्ती करणे .. (लेखाशीर्ष २२०२ २७३९)

**२. योजनेचा उद्देश** – दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांची परीक्षा फी संबंधित विद्यापीठांना परत करणे.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – विभागीय शिक्षण उपसंचालक (उच्च शिक्षण) मुंबई, कोकण विभाग पनवेल, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, जळगाव, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे**– आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :—

(रुपये हजारात)

| वर्ष | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | ५००० | ५००० | २५०० | ४७३० |
| अपेक्षित २०२१-२२ | ५००० | ५००० | १८३० | ३५३१ |
| अंदाजित २०२२-२३ | ५००० | ५००० | ५००० | ४५०० |

---

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

**१. योजनेचे नाव** - राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (२२०२ १४५६)

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७ ऑक्टोबर २०१७ अन्वये पूर्वीची ईबीसी सवलत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेत अधिक्रमित करण्यात आलेली आहे.

**२. योजनेचा उद्देश** - उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विना अनुदान) / कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये व अकृषि विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसाहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तीचा लाभ देणे.

सदर योजनेसाठी खालीलप्रमाणे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता लाभ देय आहेत.

**(१) शिक्षण शुल्क :–**

| | | अभ्यासक्रम | | | |
|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न मर्यादा | शुल्क प्रकार | शासकीय | अशासकीय अनुदानित | अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानित- विनाअनुदानित) | कायम विनाअनुदानित |
| | | **व्यावसायिक अभ्यासक्रम** | | | |
| रुपये २.५० लाखांपर्यंत | शिक्षण शुल्क | १०० टक्के | १०० टक्के | ५० टक्के | ५० टक्के |
| रुपये २.५० लाख ते रुपये ६ लाखांपर्यंत | शिक्षण शुल्क | ५० टक्के | ५० टक्के | ५० टक्के | ५० टक्के |
| | | **बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम** | | | |
| रुपये ६ लाखांपर्यंत | शिक्षण शुल्क | १०० टक्के | १०० टक्के | १०० | १०० |

**(२) परीक्षा शुल्क :–**

| | |
|---|---|
| व्यावसायिक अभ्यासक्रम | शासन नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या ५० टक्के |
| बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | शासन नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या १०० टक्के |

(रक्कम हजारात)

| अ. क्र. | वर्ष | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | प्रत्यक्ष खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२०-२१ (प्रत्यक्ष) | २५०००० | ७१५७७७ | ४४५००४ | १२६१२२ |
| २ | सन २०२१-२२ (अपेक्षित) | २५०००० | ८००००० | ४५०००० | १६०००० |
| ३ | सन २०२२-२३ (अंदाजित) | २५०००० | ८८०००० | ८८०००० | १७०००० |

## डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

**१. योजनेचे नाव** — डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता (लेखाशीर्ष - २२०२ आय ६६६)

**२. योजनेचा शासन निर्णय** — (१) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र. क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७-१०-२०१७
(२) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र. क्र. ४०७/तांशि-४, दि. २२-०२-२०१८

**३. योजनेचा उद्देश** — उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय/अशासकीय अनुदानित/अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विनाअनुदान)/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठाअंतर्गत असलेल्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ देणे.

सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे निर्वाह भत्ता लाभ देण्यात येतो.

| अ. क्र. | प्रकार | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा | वसतिगृह ठिकाण | अभ्यासक्रमांसाठी निर्वाह भत्त्याची रक्कम | प्रत्येक जिल्ह्यासाठीचा संच |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | **व्यावसायिक अभ्यासक्रम** | | |
| १ | ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. | निरंक | मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी | रु. ३०,००० | अमर्याद |
| | | | इतर शहरे/ग्रामीण भागासाठी | रु. २०,००० | |
| २ | इतर विद्यार्थ्यांसाठी | रु. १.०० लाखापर्यंत | मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी | रु. १०,००० | अमर्याद |
| | | | इतर शहरे/ग्रामीण भागासाठी | रु. ८,००० | |
| ३ | इतर विद्यार्थ्यांसाठी | रु. १.०० लाख ते रु. ८.०० लाख | मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी | रु. १०,००० | ५०० |
| | | | इतर शहरे/ग्रामीण भागासाठी | रु. ८,००० | |
| | | | **बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम** | | |
| ४ | विद्यार्थी | रु. १.०० लाखापर्यंत | -- | रु. २,००० | |

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे** – आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :—

(रुपये हजारात)

| | वर्ष | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | | ३ | ४ |
| प्रत्यक्ष | २०२०-२१ | ८००० | ३०००० | ६०२० | ७५२ |
| अपेक्षित | २०२१-२२ | ८००० | ३०००० | २९४४६ | २९९३ |
| अंदाजित | २०२२-२३ | ८००० | ३०००० | १५००० | १६०० |

**५. योजनेची अंमलबजावणी यंत्रणा** – संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

## माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती

१. **योजनेचे नाव** – माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती .. (लेखाशीर्ष २२०२ २७१२)

२. **योजनेचा उद्देश** – महाराष्ट्रात भरती झालेल्या किंवा महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र दाखल केलेल्या मेजर वा नौदल आणि वायूदल किंवा तत्सम दर्जाच्या हुद्यापर्यंत किंवा त्यापेक्षा कमी हुद्यावरून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या मुला-मुलींना/पत्नींना/विधवांना शैंक्षणिक सवलती मंजूर करणे.

३. **अंमलबजावणी यंत्रणा** – विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), मुंबई, कोकण विभाग, पनवेल, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, जळगाव, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर.

४. **योजनेची भौतिक उद्दिष्टे**– आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :—

(रुपये हजारात)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष | २०२०-२१ | १०० | २०० | १२६ | ८७ |
| अपेक्षित | २०२१-२२ | १२० | २०० | ९८ | ४० |
| अंदाजित | २०२२-२३ | १५० | २०० | २०० | ६० |

## अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

(केंद्र शासन पुरस्कृत)

**१. योजनेचे नाव** – अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती .. (लेखाशीर्ष २२०२ E ७७८)

**२. योजनेचा उद्देश** – राज्यातील मुस्लिम /ख्रिश्चन/बौध्द/शीख/व पारशी या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

**३. योजनेचे स्वरूप** – उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण २००७/५४२/०७/तांशि/१, दिनांक २१ जानेवारी २००८ व केंद्र शासन अल्पसंख्याक कार्यालय मंत्रालय यांचे पत्र, क्रमांक २० डिसेंबर २००७/पीटी /पीपीआर/दिनांक २८ मार्च २००८ चे पत्र व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण सीएफ-२००८/९५/०८/मशि-६, दिनांक १० एप्रिल २००८ नुसार राज्यातील मुस्लिम/ख्रिश्चन/बौध्द/शीख/पारशी व जैन या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना सन २००७-०८ पासून सुरू करण्यात आली.

**४. योजनेच्या अटी**

(१) या शिष्यवृत्तीसाठी मागील अंतिम परीक्षेत ५० टक्के गुण असणेची अट बंधनकारक आहे.

(२) सदर अल्पसंख्याक समाजातील दारिद्र्य रेषेखालील उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल व नंतर उत्पन्न मर्यादेच्या चढत्या क्रमाने पात्र विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

(३) सदर शिष्यवृत्तीधारकास अन्यत्र दुसरी कोणतीही शिष्यवृत्ती अथवा प्रशिक्षण विद्यावेतन घेता येणार नाही.

(४) सदर शिष्यवृत्तीधारकास पालकांचे वार्षिक उत्पन्न सर्व मार्गानी मिळून २.०० लाखापर्यंत अट बंधनकारक राहील.

(५) सदर शिष्यवृत्तीसाठी एकूण पात्र ठरविण्यात आलेल्या लाभार्थ्यी संख्येच्या ३० टक्के लाभार्थी ह्या विद्यार्थ्यांनी असणेची अट बंधनकारक राहील.

(६) सदर शिष्यवृत्ती प्रत्येक कुटुंबातील फक्त दोन अपत्यांना अनुज्ञेय असलेली अट बंधनकारक राहील.

(रुपये हजारात)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष | २०२०-२१ | -- | १४००० | २५७७ | -- |
| अपेक्षित | २०२१-२२ | -- | ६००० | ४००० | -- |
| अंदाजित | २०२२-२३ | -- | ६००० | ६००० | -- |

**टीप :** विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम केंद्र शासनाकडून परस्पर विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होणे.

सदर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम २०१४-१५ पासून केंद्र शासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर (DBT Mode) जमा करण्यात येते.

सदर शिष्यवृत्तीच्या प्रशासकीय खर्चाची रक्कम केंद्रशासनाकडून राज्य शासनाकडे वितरित करण्यात येते. (२२०२-E-७७८ १३ कार्यालयीन खर्च).

सदर प्रशासकीय खर्चात शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी विविध वृत्तपत्रांना देण्यात येणाऱ्या जाहिरातींचा खर्च, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनाचा खर्च तसेच संगणक, प्रिंटर इत्यादी कार्यालयीन सामग्रीसाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

## शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती

**१. योजनेचे नाव** – शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती .. (लेखाशीर्ष २२०२ H ०९१)

**२. योजनेचा उद्देश** – राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी. एच. डी. करता यावी. या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. शासन निर्णय दिनांक ५-२-२००४ नुसार सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांस पीएचडी प्रतिवर्ष रुपये ९००० व रुपये १००० वार्षिक सादीलवार खर्च हे लाभ देण्यात येतात.

**३. अंमलबजावणी यंत्रणा** – सदर योजनेसाठी खालील १४ संच मंजूर आहेत.

| अ. क्र. | शासकीय संस्था/महाविद्यालयाचे नाव | | संच |
|---|---|---|---|
| १ | शासकीय विज्ञान संस्था, मुंबई | .. | ०३ |
| २ | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | .. | ०३ |
| ३ | शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद | .. | ०३ |
| ४ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती | .. | ०१ |
| ५ | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | .. | ०१ |
| ६ | राज्यातील अकृषी विद्यापीठे व सल्गिनत महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांसाठी | .. | ०३ |
| | एकूण | .. | १४ |

वरीलप्रमाणे अनुक्रमांक १ ते ५ मधील संच महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्यांनी गठित केलेल्या समितीमार्फत निवडण्यात येतात. तसेच अनुक्रमांक ०६ मधील ०३ संच शिक्षण संचालकांच्या स्तरावर गठित केलेल्या समितीमार्फत निवडण्यात येतात.

**४. योजनेची भौतिक उद्दिष्टे–** आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :--

(रुपये हजारात)

| वर्ष | भौतिक उद्दिष्ट (लाभार्थी) | मंजूर तरतूद | कार्यक्रमावरील खर्च | भौतिक साध्य (लाभार्थी) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रत्यक्ष २०२०-२१ | १४+नूतनीकरण | २५९ | ० | ० |
| अपेक्षित २०२१-२२ | १४+नूतनीकरण | २५९ | ११९ | १४ |
| अंदाजित २०२२-२३ | २८+नूतनीकरण | २५९ | २३८ | २८ |

## जन्मशताब्दी समारंभ व साहित्याला उत्तेजन

**प्रस्तावना- जन्मशताब्दी समारंभ व साहित्याला उत्तेजन (लेखाशीर्ष २२०५ ०४५८)**

शिक्षणाव्यतिरिक्त, शिक्षण संचालनालय (उ.शि.) **कला आणि संस्कृती** या सदरात समाविष्ट होणाऱ्या काही योजना राबविते. या योजनांच्या यशस्वी अमंबजावणीसाठी, विशेषकरून शताब्दी समारंभ साजरे करण्यासाठी, समारंभाचा व्याप आणि ज्या व्यक्तीप्रीत्यर्थ हे समारंभ साजरे करण्यात येत आहेत त्या व्यक्तीचे महत्त्व जाणून प्रतिवर्षी शासनाकडून सल्लागार समितीची नियुक्ती करण्यात येते. लोकसाहित्याचे संशोधन आणि प्रकाशन करण्यासाठी लोकसाहित्य समिती स्थापन करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीची स्थापना सन १९५६ साली झाली. समितीची ध्येयधोरणे व कामे खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत.

१. मराठी प्रदेशातील लोकसाहित्याचे संशोधन करणे, जतन करणे व प्रकाशन करणे.

२. मिळविलेल्या लोकसाहित्याची विषयावर मांडणी करून संपादित व सचित्र आवृत्ती प्रकाशित करणे.

३. आकर्षक स्वरूपातील लोकसाहित्याचा ग्रंथ स्वस्त किंमतीत वाचकांना उपलब्ध करून देणे.

४. लोकसाहित्याचा प्रसार करणे.

५. जरूर तेथे इतर भाषेतील लोकसाहित्याचा व मराठीतील लोकसाहित्याचा तुलनात्मक अभ्यास करणे. तसेच मराठीतील लोकसाहित्याची वैशिष्ट्यपूर्ण माहिती परदेशीयांना करून देणे.

६. लोकसाहित्यातील बोली भाषेचा भाषाशास्त्राच्या व समाजशास्त्राचे दृष्टीने अभ्यास करणे.

७. लोक संस्कृतीचा अभ्यास करणे

८. लोकसंगीताचा व लोककलांचा अभ्यास करणे.

९. लोकगीते, लोककथा, कहाण्या, म्हणी व उखाणे इत्यादीचे ध्वनिमुद्रण करणे.

१०. लोकसंगीत व लोकनृत्ये सादर करणे.

११. लोककलांची सचित्र माहिती प्रकाशित करणे, प्रदर्शन भरवणे.

१२. निरनिराळ्या विषयावरील एकूण ३० ग्रंथ प्रसिध्द केले आहेत.

१३. जवळजवळ शे-सव्वाशे निरनिराळ्या लोकगीतांचे ध्वनिमुद्रण केले आहे.

१४. लोकसाहित्याच्या प्रकाशनास अनुरूप असे विविध फोटो घेतले आहेत.

१५. आकाशवाणीवरून लोकगीते व लोककथा सादर करण्यात आल्या आहेत.

१६. तसेच लोकसाहित्यावर आधारित असे अनेक सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केले गेले आहेत.

१७. लोकसाहित्यविषयक संमेलने भरविली गेली.

१८. प्रेक्षकांचे समोर मान्यवरांचे उपस्थितीत लोकगीते व लोकनृत्ये सादर केली आहे

१९. लोककलांची प्रदर्शने भरविली आहेत.

## लोकसाहित्य निर्मिती

महाराष्ट्र लोकसाहित्य समितीच्या स्थापनेचा उद्देश महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागात लोकसहित्य, लोकनृत्ये आणि लोकगीते जमा करून, त्यांचे प्रकाशन करणे असा आहे. हे कार्य ग्रामीण व शहरी विभागाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या संवर्धनासाठी करण्यात येतो. ही समिती लेखकांसाठी परिसंवाद आयोजित करून लेखकांस लोकसाहित्यावर पुस्तके लिहिण्यास उत्तेजन देते. ह्या समितीने आजवर ३४ लोकसाहित्य ग्रंथाचे प्रकाशन केले असून सर्वसाधारणपणे प्रतिवर्षी एका पुस्तकाचे प्रकाशन करते. **(लेखाशीर्ष २२०५ ००९१)**

**समितीने घेतलेल्या सभा / भेटी आणि प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे संख्यादर्शन तक्ता**

**तक्ता ३७ Table XXXVII**

| वर्गीकरण (classification) | प्रत्यक्ष (Actual) २०२०-२१ | अपेक्षित (Anticipted) २०२१-२२ | अंदाजे (Estimated) २०२२-२३ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| घेतलेल्या सभांची संख्या | ०० | ५ | ७ |
| दिलेल्या भेटींची संख्या | - | - | - |
| प्रकाशित केलेल्या पुस्तकांची संख्या अथवा प्रकाशित करण्याचे ठरविलेल्या पुस्तकांची संख्या | २७ लोकसाहित्य विषयक ग्रंथ रिप्रिंटिंग | ४ नवीन लोकसाहित्य विषयक ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. | |

महाराष्ट्र प्रदेशातील लोकसाहित्य/लोकसंस्कृती/लोकसंगीत इत्यादीबाबतचे संम्मेलन पुणे येथे आयोजित करण्याचा निश्चित केले आहे. **सद्‌गुरु अचुताश्रम स्वामीकृत अभंगगाथा,** यात संतसाहित्याचा परिचय व अभ्यास यामध्ये होणार आहे. **महाराष्ट्राचे लोकवैभव - तमाशा,** प्रकाशित करण्याचा मानस आहे.

**आदिवासी मावची - आदिवासी साहित्य, आदिवासी भाषा यांचा अभ्यास.** वरीलप्रमाणे लोकसाहित्य प्रकाशित करण्याचे कार्य सुरू असून येत्या कालावधीत जनतेसाठी हे साहित्य खंड उपलब्ध करण्यात येणार आहे.

## थोरसमाजसेविका कै. सावित्रीबाई फुले पुरस्कार योजना

**(२) साहित्य व समारंभ - (लेखाशीर्ष २२०५ ०४५८)**

संत महात्मे आणि थोर मोठे राष्ट्रीय नेते ज्यांनी समाजासाठी आणि उज्ज्वल राष्ट्रनिर्मितीसाठी आपले उभे आयुष्य वेचले अशा व्यक्तींचे जन्मसमारोह राज्यभर साजरे केले जातात. कै. सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या अमूल्य कार्याचा गौरव व त्यांनी केलेल्या कार्याचे स्मरण रहावे तसेच कार्याचा वसा पुढील काळात सुरू रहावा त्या दृष्टीने शासनाने सन १९८०-८१ पासून कै. सावित्रीबाई फुले यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सामाजिक समता, स्त्री शिक्षण तसेच कमकुवत गटातील मुलामुलींचे शिक्षण या व अशा क्षेत्रामध्ये निरलसपणे व सेवावृत्तीने कार्य करणाऱ्या एका महिलेस रुपये ५,००० चा पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला. सन १९८३-८४ पासून पुरस्कार संख्येत वाढ करण्यात आली आहे. सन १९९२-९३ पासून पुरस्कार संख्या ६ पर्यंत वाढविण्यात आली. तद्‌नुसार महाराष्ट्रातील सहा महसूल विभागानुसार सहा महिलांची पुरस्काराकरिता निवड करण्यात येते.

सन १९९७-९८ पासून पुरस्काराची रक्कम रुपये ५००० वाढवून ती प्रत्येक पुरस्कार प्राप्त महिलेस रुपये ११,००० एवढी वाढविण्यात आली आहे. तसेच सन २००२-०३ मध्ये पुरस्काराची रक्कम रुपये ११,००० वरुन रुपये २५,००० पर्यंत वाढविण्यात आली आहे. वरीलप्रमाणे प्रतिवर्षी महाराष्ट्रातील सहा समाजसेविकांना कै. सावित्रीबाई फुले पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सदर पुरस्काराची घोषणा कै. सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी म्हणजे ३ जानेवारी रोजी करण्यात येते. तसेच १० मार्च म्हणजे कै. सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी दिवशी सदर पुरस्कार वितरित करण्यात येतो.

## शिक्षक पुरस्कार व संस्कृत पुरस्कार

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

### विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षक पुरस्कार

आयुष्यभर ज्ञानदान करून चांगला नागरिक आणि उत्कृष्ट राष्ट्र निर्माण करणाऱ्या शिक्षकाला त्यांच्या कार्याचा योग्य गौरव करून आणि असे आदर्श शिक्षक होण्याची इतरांना प्रेरणा देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने विद्यापीठ/महाविद्यालयीन/कला/तंत्र/व्यवसाय शिक्षण क्षेत्रातील आदर्श शिक्षकांना प्रतिवर्षी ५ सप्टेंबर या शिक्षकदिनी राज्य शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. सदर पुरस्कार प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांप्रमाणे सन १९९०-९१ पासून दिला जात असून विद्यापीठ महाविद्यालयीन स्तरावरील अभियांत्रिकी (फार्मसीसह) २, तंत्रनिकेतन ३, औद्योगिक प्रशिक्षण संस्था ६ (विभागीय), शासकीय तांत्रिक विद्यालय ६ (विभागनिहाय), कला शिक्षण क्षेत्रातील १ असे एकूण ३१ शिक्षकांना पुरस्कार देण्यात येतो. शासन निर्णय क्रमांक पुरस्कार-२६१२/(प्र. क्र. १८२/१३)/समन्वय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, दिनांक १० सप्टेंबर २०१३ अन्वये शासनाने सन २०१२-२०१३ पासून आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रत्येक शिक्षकास रुपये १०,००० वरून रुपये २५००० इतक्या रोख रकमेचे पारितोषिक मंजुरी दिलेली आहे.

### संस्कृत पंडित पुरस्कार

संस्कृत भाषा ही सर्व भाषांची जननी असून भारताची मूलभूत भाषा आहे. सदर भाषेचा प्रचार आणि प्रसार होण्याकरिता ज्या व्यक्तींनी संस्कृत विषयात योगदान केलेले आहे अशा संस्कृत पंडितांना केंद्र शासनाच्या निर्णयानुसार १९७२ पासून दरवर्षी श्रावणी पौर्णिमेस म्हणजेच नारळी पौर्णिमेस म्हणजेच संस्कृत दिवस समारोह साजरा करण्यात येतो. त्या दिवशी महाराष्ट्रातील ७ व अन्य राज्यातील १ अशा ८ संस्कृत पंडितांना सन १९९९-२००० पासून प्रत्येकी रुपये २५००० व मानपत्र तसेच संस्कृत विषयात विशेष नैपुण्य दाखविलेल्या बी. ए. व एम ए. च्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये १००० पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार करण्यात येतो.

### खालील तक्ता शासनाने प्रकाशित केलेल्या व होणाऱ्या पुस्तकांची माहिती दर्शवितो

### तक्ता ३८ Table XXXVIII

**प्रत्यक्ष सन २०२०-२१ माहिती**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती**

जनता पाक्षिकाच्या अंकाचे २५ खंड पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याबाबत व छपाई करून प्रकाशनासाठी उपलब्ध असलेला खंड क्रमांक ३-१ जनता या खंडाचे प्रकाशन करून दिनांक १४ एप्रिल २०२१ रोजी लोकार्पण करण्यात आले आहे. खंड क्रमांक ४ मराठी अनुवाद, खंड क्रमांक १३ इंग्रजी पुर्नमुद्रण, मुद्रणालयात छपाई सुरू आहे. जनता खंड क्रमांक ३-२, ३-३, ३-४, ३-५, ३-६, ३-७, ३-८, ३-९, ३-१० डी.टी.पी.चे काम सुरू आहे. जनता विशेषांक डी. टी. पी. चे काम सुरू आहे.

**महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती**

महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समितीतर्फे आतापर्यंत १६ ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आलेले आहेत.

**राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती**

राजर्षी शाहू गौरव ग्रंथ- दिनांक २६ जून २०१६ रोजी प्रकाशन करण्यात आले असून याच्या १०००० प्रतींची छपाई पूर्ण झाली आहे.

**लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती**

खंड क्रमांक ३ व खंड क्रमांक ४ प्रकाशनाचे काम हाती घेण्यात आले आहे.

**महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती**

एकूण पहिल्या टप्प्यात २५ खंडाचे काम हाती घेण्यात आले होते यातील १२ खंड तयार झालेले आहे. उर्वरित १३ खंडाच्या ५१ पुस्तकांच्या प्रत्येकी ५००० प्रतींचे छपाई पूर्ण करण्यात आली आहे व शासकीय मुद्रकाकडे विक्रीस उपलब्ध आहेत.

**लोकसाहित्य समिती**

प्रकाशन झालेले नाही

## अपेक्षित सन २०२१-२२ माहिती

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती**

१. जनता खंड क्रमांक ३-१ चे प्रकाशन करण्यात आले आहे. २. खंड क्रमांक ६ दी प्रॉब्लेम ऑफ रुपी मराठी अनुवाद प्रकाशित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे पुनर्मुद्रण, नवीन छपाई व मुद्रितशोधन सुरू असलेले एकूण १४ खंडांचे काम चालू आहे. यापुढे नियोजित कामांमध्ये आंबेडकर कोश, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, वीस प्रकल्प, जनता पाक्षिकाचे पुढील अंक व इतर खंडांचे राहिलेले अनुवाद करणे हे आहेत.

**महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती**

१. महात्मा फुले समग्र वाङ्मय हा ग्रंथ प्रकाशित केला. २. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय हा ग्रंथ प्रकाशित केला. महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समितीचे एकूण १६ ग्रंथ प्रकाशित करण्यात आले आहेत. महात्मा फुले समग्र वाङ्मय, या ग्रंथाच्या २५,२२५ प्रती मुद्रण व बांधणीचे मागणीपत्र माननीय व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांना दिले होते. या ग्रंथाच्या ३,००० प्रती छापून तयार झाल्या आहेत. उर्वरित प्रतींची बांधणी प्रक्रिया चालू आहे. छपाईचे काम मुद्रणालयात चालू आहे. ७ खंडांचे पुनर्मुद्रण झालेले आहेत.

**राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती**

राजर्षी शाहू गौरव ग्रंथ- १०,००० प्रतींची छपाई पूर्ण. क्रांतिसूक्ते राजर्षी शाहू- डी.टी.पी. पूर्ण. प्रथम मुद्रितशोधन पूर्ण. मुद्रिते समितीकडे आहेत.

Gimples of Rajarshi Shahu Maharaja- डी. टी. पी. पूर्ण. प्रथम मुद्रितशोधन पूर्ण. मुद्रिते समितीकडे आहेत.

**लोकशाहीर अण्णा भाऊ साठे खंड प्रकाशन झाले नाही**

समग्र वाङ्मय खंड क्रमांक १ व २ पुर्नप्रकाशित करण्याचा ठराव समितीने घेतला आहे. खंड क्रमांक ३ बाबत १२ कथासंग्रह खंड क्रमांक ४ चे संपादन करून प्रकाशन करण्याचे काम योजिले आहे.

**महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती**

उर्वरित १३ खंडाच्या ५१ पुस्तकांच्या प्रत्येकी ५,००० प्रतींचे छपाई पूर्ण करण्यात आली आहे व शासकीय मुद्रकाकडे विक्रीस उपलब्ध आहेत.

## अंदाजित सन २०२२-२३ माहिती

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती यांच्याकडे जनताचे एकूण २४ नवीन खंड छापता येतील इतके साहित्य समितीकडे उपलब्ध आहे. या आर्थिक वर्षात काम करण्यात येणार आहे.

**फुले समिती छपाई चालू असलेले ग्रंथ**

१. " शोधाच्या नव्या वाटा " हा ग्रंथ मुद्रितशोधन चालू आहे. २. युगपुरुष महात्मा फुले या हिंदी चरित्राची नवी आवृत्ती प्रकाशित करणे. ३. महात्मा फुले यांच्या नाटकाचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध करणे. ४. महात्मा फुले यांच्या कवितांच्या हिंदी अनुवाद प्रकाशित करणे.

**महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती**

एकूण पहिला टप्पा १२ खंड तयार झालेले आहे. या आर्थिक वर्षात काम करण्यात येणार आहे. उर्वरित १३ खंडाच्या ५१ पुस्तकांच्या प्रत्येकी ५,००० प्रतींचे छपाई पूर्ण करण्यात आली आहे व शासकीय मुद्रकाकडे विक्रीस उपलब्ध आहेत.

**महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती -**

महाराष्ट्र प्रदेशातील लोकसाहित्य / लोकसंस्कृती /लोकसंगीत इत्यादीबाबतचे संमेलन पुणे येथे आयोजित करण्याचे निश्चित केले आहे. **सद्‌गुरु अचुताश्रम स्वामीकृत अभंगगाथा,** यात संत साहित्याचा परिचय व अभ्यास यामध्ये होणार आहे. महाराष्ट्राचे लोकवैभव- तमाशा, प्रकाशित करण्याचा मानस आहे.

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती** (लेखा शीर्ष २२०५-३१४३)

**१. योजनेचे नाव** – साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती.

**२. योजनेचा उद्देश भाग-२**– साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे संपूर्ण वाङ्मय ग्रंथ स्वरूपात प्रकाशित करणे, योजनेचे स्वरूप उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक लोअसा-२०१२/(प्र. क्र. १४०/१२) २००७/५४२/०७/ताशि/१, दि. २१ जानेवारी २००८ व केंद्र शासन अल्पसंख्याक कार्यालय /समन्वय, दिनांक १२ जून २०१४. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे चरित्रावर प्रकाशित केलेल्या ग्रंथांना महाराष्ट्रात, देशात, परदेशातदेखील मोठी मागणी आहे.

१. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे संपूर्ण वाङ्मय ग्रंथ स्वरूपात प्रकाशित करणे.

२. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हिंदी व इंग्रजी आदी भाषांमध्ये प्रकाशित करणे.

३. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे सप्रमाण व अद्ययावत चरित्र लिहून, त्यांचे हिंदी व इंग्रजी आदी भाषांमध्ये भाषांतर करणे व प्रसिध्द करणे.

४. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे जीवनकार्यावरील तसेच समीक्षापर साहित्य प्रकाशित करणे.

५. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे अप्रकाशित साहित्याचे संकलन व संपादन करणे.

६. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे संशोधन करणे.

---

## महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती

**प्रस्तावना—** शा. नि. क्र. संकीर्ण-१११९/(प्र.क्र.-८१/१६)/समन्वय/मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

तारीख १७ ऑक्टोबर २०१६ नुसार समिती स्थापना

महाराष्ट्राच्या वैचारिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक बांधणीत महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्या. रानडे अशा अनेक समाजधुरीणांचे योगदान आहे. या सर्वांना महाराजा सयाजीराव गायकवाड यांची थेट मदत होती. या सर्व समाजधुरीणांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. आजही महाराजा सयाजीराव गायकवाडांच्या कार्यकर्तृत्वाचा आणि राजकीय सामाजिक प्रयोगांचा नमुनादर्शक उपयोगी पडू शकतो. दोन वर्षांपूर्वी त्यांची १५० वी जयंती साजरी झाली आहे. महाराष्ट्र शासनाने राज्याच्या पुरोगामीत्वाची जडणघडण करण्यास प्रेरणादायी ठरलेल्या या आदिनेत्याची ओळख जागविण्यासाठी विशेष कृती प्रकल्प हाती घ्यावा या उद्देशाने महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना केली.

**समितीची उद्दिष्टे — महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीची सदस्य-सचिवांची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे :—**

(१) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे समग्र वाङ्मय प्रसिद्ध करून त्यांचे हिंदी, इंग्रजी आदि भाषांमध्ये भाषांतर करणे व प्रसिद्ध करणे.

(२) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अद्ययावत व सप्रमाण चरित्र लिहून हिंदी, इंग्रजी आदि भाषांमध्ये भाषांतर करणे व प्रसिद्ध करणे.

(३) जीवन कार्यावरील तसेच समीक्षापर साहित्य प्रकाशित करणे.

(४) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अप्रकाशित साहित्यांचे संकलन व संपादन करणे.

(५) महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रकाशित साहित्याचे संशोधन करणे.

(६) शासन निर्णय क्रमांक डीबीए-२००८/(८६/०८)/समन्वय, दिनांक १८ ऑक्टोबर २००९ अन्वये सदस्य सचिवाच्या कामकाजाबाबत जी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आलेली आहेत. तीच मार्गदर्शक तत्त्वे या समितीच्या सदस्य सचिवांची राहील.

---

## महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था

**योजनेचे नाव** : महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची स्थापना करणे. लेखाशीर्ष (२२०२ आय ७१९)

**योजनेचा उद्देश** : विद्यापीठे आणि उच्च व तंत्र शिक्षण भागाच्या अधिनस्त शिक्षकीय प्रवर्गातील अध्यापकांच्या व्यावसायिक क्षमतेचा प्रशिक्षणाद्वारे नियमित विकास करणे, उच्च शिक्षणामधील पारंपरिक शिक्षण पद्धती बदलून कौशल्याधारित व उद्योगाभिमुख प्रशिक्षण पद्धती अवलंबिण्यासाठी अध्यापकांना प्रशिक्षित करणेबाबत. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा. नि. क्र. संदर्भ-२०१८/प्र. क्र. ३४४/मशि-५, दिनांक १३ सप्टेंबर २०१९ व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा. नि. क्र. संदर्भ-२०१८/प्र. क्र. ३४४/मशि.-५, दिनांक २४ फेब्रुवारी २०२० सदरची योजना सन २०२०-२१ पासून कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**योजनेचे स्वरूप** : उच्च शिक्षण पद्धतीमध्ये कालानुरूप बदल होत आहे. त्यानुसार व्यावसायिक व रोजगारक्षम शिक्षणास महत्त्व प्राप्त होत आहे. तसेच उद्योग व्यवसाय यशस्वीपणे चालविण्यासाठी बुद्धिमत्ता व वैज्ञानिक कौशल्य असलेल्या तज्ज्ञ मनुष्यबळाची आवश्यकता आहे. जागतिक पातळीवर गुणवत्ता, ज्ञानसंवर्धन, ज्ञान शक्तीची वाढ व या वाढीसाठी केलेले संशोधन यांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये होऊन त्यादृष्टीने शिकविण्याच्या पद्धतीमध्ये बदल होणे अपेक्षित आहे. त्याकरिता तज्ज्ञ अध्यापकवर्ग निर्माण करणे. याअनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या व नव्याने नियुक्त होणाऱ्या अध्यापकांकरिता एक सर्व समावेशक केंद्रीय प्रशिक्षण योजना तयार करणे. यामध्ये पारंपरिक प्रशिक्षण पद्धती बदलून कौशल्याधारित व उद्योगाभिमुख प्रशिक्षण पद्धती अवलंबिणे.

**संस्थेची उद्दिष्टे**

- अध्यापकांच्या व्यावसायिक पात्रता वाढीसाठी प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम विकसित करणे.
- उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील शिक्षकांना उद्योग / व्यवसाय व त्यांच्या संबंधित क्षेत्राचे अद्ययावत ज्ञान, शैक्षणिक पद्धती / तंत्रज्ञान यांनी समृद्ध करणे.
- स्थानिक भाषेमध्ये तेथील अभ्यासक्रमाशी निगडित MOOCs (Massive Online Courses) विकसित करणे.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये झालेल्या बदलांच्या आधारे प्रशिक्षणाची परिणामकारकता तपासून प्रशिक्षण पद्धतीमध्ये गरजेनुरूप बदल करणे.
- उद्योग क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या / होणाऱ्या रोजगार संधींच्या आधारे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम विकसित करून तसे बदल अभ्यासक्रमामध्ये करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना मार्गदर्शन करणे.
- शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रभावी शिकणे-शिकवण्याची पद्धती स्थापित करणे व शैक्षणिक क्षेत्रामध्ये संशोधनास प्रोत्साहित करणे.
- शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उत्तम अध्यापकांना एकत्रित करून त्या आधारे संपर्क जाळे ( नेटवर्क ) प्रस्थापित करून शैक्षणिक क्षेत्रातील उत्तम पद्धती प्रसारित करणे.
- उच्च क्षमता, विद्याव्यासंग विकसित करून अध्यापन, संशोधन या क्षेत्रातील उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी गहन वचनबद्धता असलेल्या विविध विद्याशाखांचे संवर्ग महाराष्ट्रातील उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये समयबद्ध पद्धतीने निर्माण करणे.
- पायाभूत / उजळणी / अभिमुख / नियतकालिक प्रशिक्षण आयोजित करणे.
- उच्च शिक्षण संस्थांमधील अधिव्याख्यामध्ये व्यावसायिक मानक विकसित करणे.
- उद्योग व व्यवसाय अनुरूप अशा अभ्यासक्रमाप्रमाणे सुधारणा करण्यासाठी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेस शिफारशी करणे.
